उपरोक्त सादर प्रस्तावानुसार Proposed development of City Survey No. 1911 for LCMC Latur या कामाचे सुधारीत तांत्रिक मान्यता प्राप्त अंदाजपत्रक रु. १०,७९,३३,७४८/- ला सुधारीत आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. परीमाणात वाढ झाल्याने शासनाच्या सा.बां. विभागाच्या नियमावलीप्रमाणे निविदा खंड ३८ लागु होईल व प्रस्तावात नमुदनुसार आवश्यक अतिरीक्त बाबींना मान्यता देण्यात येत आहे. अतिरीक्त लागणारा निधी रु. ७,३६,८४,७२८/- हा म.न.पा. निधी / जिल्हा वार्षिक योजना / शासकीय योजना मधून उपलब्ध करून घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

प्रशासक,
लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका लातूर

ठराव क्रमांक 03 दिनांक 26.05.2022

प्रस्तावः-

सन 2011-12, ते 2015-16 या वितीय वर्षाच्या स्थानिक लेखापरीक्षण अहवालावरील परिच्छेदांचे प्रथम अनुपालन अहवाल महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 107(अ) अन्वये मा. सर्वसाधारण सभेपूढे सादर करणे व मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 (सुधारणा 2011) चे कलम-10(1) अन्वये उपसंचालक(मनपालेप) स्थानिक निधी लेखापरीक्षा, औरंगाबाद यांना सादर करणे बाबत.

लातूर शहर महानगरपालिकेचे सन 2011-12 ते 2015-16 या वर्षाचे लेखापरीक्षण उपसंचालक स्थानिक निधी लेखा परीक्षा कार्यालय औरंगाबाद यांचेकडून लेखापरीक्षण झाले असून लेखापरीक्षण अहवाल वेळोवेळी या कार्यालयास प्राप्त झालेले आहे. सदर 5 वर्षाचे अहवालात एकूण 573 परिच्छेद समाविष्ठ आहेत. सदर 5 वर्षाच्या 573 परिच्छेदांपैकी 278 परिच्छेदांचे अनुपालन विभागाने सादर केले आहे.

तरी वर्षनिहाय व विभागनिहाय अनुपालन सादर केलेल्या परिच्छेदांची वर्षनिहाय व विभागनिहाय माहिती सोबतच्या विवरणपत्रात सादर असून उक्त परिच्छेदांचे अनुपालन मा. उपसंचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षक यांना सादर करणे बाबत मान्यतेस्तव सादर.

आयुक्त,
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

निर्णयः-

उपरोक्त सादर प्रस्तावानुसार साल सन 2011-12,2012-13,2013-14,2014-15 व 2015-16 या वितीय वर्षाच्या स्थानिक निधी लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेदांचे अनुपालन अहवालास मान्यता देऊन अनुपालन अहवाल उपसंचालक(मनपालेप)स्थानिक निधी लेखापरीक्षा कार्यालय औरंगाबाद यांचेकडे पाठविणेसाठी मान्यता देण्यात येत आहे.

नगर सचिव

प्रशासक

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका लातूर

ठराव क्रमांक 04 दिनांक 26.05.2022

प्रस्तावः-

शासन निर्णय क्रमांक एफ एफ सी २०२०/प्र.क्र५६/नवी-४ दिनांक २८/१०/२०२० नगरविकास विभाग अन्वये Non Million Plus Cities गटातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्था करिता शासनाने मंजूर केलेल्या १५ व्या वित्त आयोगातील आर्थीक आराख्याडयानुसार एकूण प्राप्त होणा-या १५ व्या वित्त आयोगाच्या रक्कमेतुन Basic Grants (मुलभूत अनुदान)/अबधनकारक अनुदान या करिता ५०% निधी व बंधनकारक अनुदान मध्ये पाणीपुरवठा करिता २५% व घनकचरा व्यवस्थापनासाठी २५% निधी खर्च करण्यास प्राप्त झालेला आहे.

वरील प्रमाणे २५% एकूण घनकचरा व्यवस्थापनासाठी खर्च करण्यात आला असून सदर घनकचरा व्यवस्थापनासाठी निधी अपूरा पडत आसल्याने घनकचरा व्यवस्थापनासाठी अडचणी निर्माण होत असून घनकचरा व्यवस्थापनाच्या कामाचे देयक रोखल्यास अडचणी निर्माण होत असल्याने सध्या सदरील घनकचरा व्यवस्थापन कामाचे देयक देण्यास महानगरपालिकेत निधी उपलब्ध नाही, या करीता नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.एफ.एफ.सी/२०२०/प्र.क्र/५६/नवी-४ दि.२८/१०/२०२० च्या निर्णयातील II ब यातील ४ अनवये मुलभूत अनुदान / बधंनकारक अनुदान (Basic Grants/Untied Grants) यामधील शिल्लक निधीतील रक्कम घनकचरा व्यवस्थापनासाठी रु. ४ कोटी खर्चात मान्यता देण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

निर्णयः-

उपरोक्त सादर प्रस्तावानुसार घनकचरा व्यवस्थापन कामाचे देयक देण्यास महानगरपालिकेकडे निधी उपलब्ध नाही, या करीता नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.एफ.एफ.सी/२०२०/प्र.क्र/५६/नवी-४ दि.२८/१०/२०२० च्या निर्णयातील II ब यातील ४ अनवये मुलभूत अनुदान / बधंनकारक अनुदान (Basic Grants/ Untied Grants) यामधील शिल्लक निधीतील रक्कम घनकचरा व्यवस्थापनासाठी रु. ४ कोटी खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका लातूर

ठराव क्रमांक 05 दिनांक 26.05.2022

प्रस्तावः-

पथदिवे उपकराची आकारणी करणेबाबत.

महानगरपालिकेमार्फत शहरातील नागरीकांना पथदिव्यांची सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी पथदिवे देखभाल व दुरुस्ती तसेच विद्युत देयकापोटी कोटयावधी रुपयांचा खर्च महानगरपालिका निधीमधून करावा लागतो. शहरात इ.इ.एस.एल.कंपनीच्या माध्यमातून बसविण्यात आलेले पथदिवे आणि Automatic on-off oprating system timer साठी वार्षिक रु. 160.00 लक्ष इतका खर्च होतो,तसेच पथदिव्यांसाठी विज वितरण कंपनीच्या विद्युत देयकासाठी वार्षिक रु. 250.00 लक्ष इतका खर्च होतो. त्याचबरोबर पथदिव्यांचे मागील कालावधीतील मोठी रक्कम महानगरपालिकेकडे थकित आहे, त्याबाबत वीज वितरण कंपनीकडुन वारंवार विद्युत जोडणी खंडीत करण्यात येणार असलेबाबत नोटी इस बजावण्यात येत असते.

महानगरपालिकेकडे उपलब्ध निधीमधून विद्युत देयकाची अदायगी करण्यात येत असते, तथापि काही वेळा विद्युत देयक अदा करण्यात विलंब झाल्यास विज वितरण कंपनीकडुन विद्युत पुरवठा खंडीत करण्यात येतो.

लातूर शहर महानगरपालिका हद्दीतील नागरीकांना मुलभूत सुविधेअंतर्गत पथदिव्यांची सोय उपलब्ध करुन देणेसाठी महानगरपालिकेचे आर्थिक उत्पन्न वाढविणे आवश्यक आहे. त्यासाठी शहरात नव्याने बांधकाम परवानगी, रेखांकने तसेच गुंठेवारी नियमितीकरणाचे प्रस्तावावर पथदिवे उपकर आकारल्यास शहरातील सर्व भागातील पथदिव्यांच्या उभारणी, दुरुस्ती व देखभालीवर खर्च करणे सोईस्कर होऊन नागरीकांना मुलभूत सुविधा पुरविता येतील.

तरी प्रस्ताव योग्य त्या निर्णयास्तव सादर.

निर्णयः-

वरील सादर झालेले प्रस्तावानुसार शहरातील सर्वच प्रभागामध्ये मुलभूत सुविधे पथदिवे उभारणी, देखभाल व दुरुस्तीसाठी महानगरपालिकेचे आर्थिक उत्पन्न वाढविणे आवश्यक असल्याने

लातूर शहर महानगरपालिका हद्दीतील सर्व प्रभागात नवीन बांधकाम परवानगी, रेखांकने तसेच गुंठेवारी अधिनियमाद्वारे अनियमित भुखंड/बांधकाम नियमित करणेबाबत दाखल प्रस्तावावर खाली नमूद केल्याप्रमाणे पथदिवे उपकराची आकारणी करणेस मान्यता देण्यात येत आहे. पथदिवे उपकरांतर्गत जमा केलेली रक्कम केवळ खालील प्रयोजनासाठी वापरली जाईल.

1 सर्व परवानग्यासाठी आकारण्यात आलेला पथदिवे उपकर वसुल रक्कमेसाठी महानगरपालिकेचे स्वतंत्र खाते ठेवण्यात यावे.

Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner

2 सदर रक्कमेचा विनीयोग केवळ विद्युत देयक अदा करण्यासाठी तसेच पथदिव्यांची उभारणी, देखभाल व दुरुस्तीच्या कामासाठी करण्यात येईल.

अ.क्र.	परवानगी	पथदिवे उपकर आकारणी
1	0 ते 100 चौ.मी. क्षेत्रापर्यंतच्या बांधकाम परवानगी	निरंक
2	101 ते 200 चौ.मी. क्षेत्रापर्यंतच्या बांधकाम परवानगी	रु. 25/- प्रति चौ.मी. प्रमाणे
3	201 ते 300 चौ.मी. क्षेत्रापर्यंतच्या बांधकाम परवानगी	
4	300 चौ.मी.पेक्षा जास्तीच्या क्षेत्रांची बांधकाम परवानगी	
5	0 ते 100 चौ.मी. क्षेत्रापर्यंतच्या गुंठेवारी परवानगी	
6	101 ते 200 चौ.मी. क्षेत्रापर्यंतच्या गुंठेवारी परवानगी	
7	201 ते 300 चौ.मी. क्षेत्रापर्यंतच्या गुंठेवारी परवानगी	
8	300 चौ.मी.च्या पुढील क्षेत्राच्या गुंठेवारी परवानगी	
9	सर्व रेखांकन	रु. 10/- प्रति चौ.मी. प्रमाणे

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका लातूर

ठराव क्रमांकः- 06 दिनांक 26.05.2022

प्रस्तावः-

लातूर शहर महानगरपालिका साल सन २०२१-२०२२ चे सुधारीत व २०२२-२०२३ चे मुळ अंदाजपत्रकास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०० अन्वये मान्यता देणे बाबत.

प्रस्तावः- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ व ९५ (अ) अन्वये लातूर शहर महानगरपालिकेचे सन २०२१-२०२२ चे सुधारीत व सन २०२२-२०२३ चे मुळ अंदाजपत्रक **"अ"** व **"क"** नुसार उत्पन्न व खर्चाचे अंदाज तयार केलेले वार्षीक अर्थसंकल्पिय अंदाजपत्रक मंजुरीसाठी विशेष स्थायी समिती सभा दिनांक २१/०३/२०२२ रोजी सादर करण्यात आले होते. परंतु विशेष स्थायी समितीतील ठराव क्रमांक २५३ विषय क्र.१ मधील निर्णयानुसार तयार केलेल्या सदरील अंदाजपत्रकास मंजुरी मिळालेली असून सदस्यांच्या सुचनेसह कलम ९६ प्रमाणे स्थायी समितीच्या अंतीम मान्यतेसाठी पुढील बैठकीत सादर करण्यात यावे असा निर्णय झाला होता.

परंतु तांत्रिक कारणास्तव पुढील मा. स्थायी समितीची सभा झालेली नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९६ प्रमाणे अंदाजपत्रकास मान्यता मिळालेली नाही, तसेच महानगरपालिकेची दिनांक २०/०५/२०२२ रोजीच्या विशेष सभेमध्ये विषय क्रमांक १९ उक्त अधिनियमातील १०० अन्वये मान्यता देणे बाबत विषय घेण्यात आला होता. दिनांक २१/०५/२०२२ रोजी महानगरपालिकेचा ५ वर्षाचा कार्यकाळ संपलेला आहे. याकरिता सन २०२१-२०२२ चे सुधारीत व सन २०२२-२०२३ चे मुळ अंदाजपत्रक वरील अधिनियमातील कलम ९६ व कलम १०० अन्वये खालील प्रमाणे दुरुस्तीसह मंजुर करण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर

अ.क्र.	लेखाशिर्ष जमा बाजू	अधिनियमातील कलम ९५ प्रमाणे प्रस्तावित केलेली तरतुद	विभागाने सुचविलेली तरतुद
अ	महानगरपालिका कर		
1	मालमता कर	362669697	386169697

Scanned with OKEN Scanner

क	महानगरपालीकेची मालमता आणि सेवा यांच्यापासुन मिळालेले महसूल आणि कर आकारणी वितरीक शक्ती पासून मिळालेले उत्पन्न		
	पथदिवे उपकर	0	30000000

अ.क्र.	लेखाशिर्ष खर्च बाजू	अधिनियमातील कलम ९५ प्रमाणे प्रस्तावित केलेली तरतुद	विभागाने सुचविलेली तरतुद
क - 2	फेअीगेशन खर्च		
1	औषधे, जंतूनाशके, साहित्य फवारणी मशिन	2000000	4000000
क - 7	सार्वजनिक उद्याने खर्च		
1	उद्यान देखभाल व दुरुस्ती खर्च/ वृक्ष लागवड देखभाल दुरुस्ती	2500000	10000000
क - 2	स्वच्छता		
7	जे.सी.बी. भाडे / जे.सी.बी. इंधन	6000000	10000000
क - 8	बांधकामे खर्च		
13	प्रधानमंत्री आवास योजना सर्वेक्षण करणे	10000000	20000000
ग	महसूली भांडवली		
31	घनकचरा व्यवस्थापन/ भाडे अदाई	50000000	80000000

निर्णयः-

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ९६ व कलम १०० अन्वये लातूर शहर महानगरपालिकेचे साल सन २०२१-२०२२ चे सुधारीत व २०२२-२०२३ चे मुळ अंदाजपत्रकास वरील प्रमाणे दुरुस्तीसह मान्यता देण्यात येत आहे.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका लातूर

Scanned with OKEN Scanner

लातूर शहर महानगरपालिका, लातूर
पाणी पुरवठा विभाग

मा. प्रशासकीय ठराव विषय क्रं. ०७ ठराव क्रं. ०७ दि. ३१/०५/२०२२

विषय - लातूर शहर पाणी पुरवठा योजना, हरंगुळ जलशुध्दीकरण केंद्र येथील फिल्टर बेड मधील फिल्टर मिडीया बदलणे व स्थापत्य कामे करणे बाबत.

प्रस्ताव -

लातूर शहर पाणी पुरवठा योजना, हरंगुळ जलशुध्दीकरण केंद्र येथील फिल्टर बेड मधील फिल्टर मिडीया बदलणे व स्थापत्य कामे करणे या कामाची ई-निविदा सुचना क्रं. 8 / 2022-23 मागवण्यात आली होती. निविदा बाबतचा सविस्तर माहिती खालील ..माणे.

1. निविदा मागवलेला कालावधी दि. 06.05.2022 ते 12.05.2022 पर्यंत
2. मुदतीत एकुण तीन निविदा प्राप्त असल्याचे बीड रिपोर्ट वरुन निदर्शनास आलेनुसार दि. 12.05.2022 रोजी प्राप्त 3 निविदेचा तांत्रिक लिफाफा उघडण्यात आला. निविदाचे कागदपत्राची छाणणी केली असता प्राप्त 3 निविदापैकी 2 निविदाधारक वैद्य असल्याने सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक क्रं. सी.टी. 2017 / प्र.क्रं. 8 / इमा-2 दि. 29.01.2019 अन्वये वैद्य प्राप्त दोन निविदाधारकाचा दुसरा (अर्थिक) लिफाफा दि. 25.05.2022 रोजी उघडण्यात आला.
3. उघडण्यात आलेल्या निविदा दरा बाबत खा...ाप्रमाणे माहिती विवरणामध्ये सादर.

अ. क्रं.	निविदाधारकाचे नांव	अंदाजपत्रकीय रक्कम	प्राप्त दर 9% जास्तीचे
1.	व्रज कन्स्ट्रक्शन, अहमदाबाद.	91,51,019.76	9% जास्तीचे रक्कम रु. 99,74,611.54
2.	कृष्णा कन्स्ट्रक्शन कं, अहमदाबाद.		18% जास्तीचे रु. 1,07,98,203.32

व्रज कन्स्ट्रक्शन, अहमदाबाद यांचे दर अं... पत्रक दरापेक्षा 9 % जास्तीचे प्राप्त होते. त्यांना लेखी पत्र देऊन दि. 26.05.2022 रोजी समक्ष वाटाघाटीसाठी बोलावण्यात आले. वाटाघाटी अंति व्रज कन्स्ट्रक्शन यांनी 9% ऐवजी एक टक्का कमी करुन 8 % जास्तीने काम करण्यास संमती दिलेली आहे. सर्वात कमीचे दर व्रज कन्स्ट्रक्शन, अहमदाबाद 8 % जास्तीचे म्हणजे रु. 98,83,101.34 होतात.

निर्णय :- व्रज कन्स्ट्रक्शन, अहमदाबाद यांचे सर्वात कमीचे दरास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांनी या प्रशासकीय ठरावानुसार त्वरीत कार्यवाही करावी.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका लातूर

ठराव क्रमांकः- ०४ दिनांक 31.05.2022

प्रस्तावः-

लातूर शहर परिवहन बससेवेमध्ये महिलांना दिलेल्या मोफत प्रवासाचा मोबदला संबंधित अभिकर्त्यास प्रधान करणे बाबत.

लातर शहर महानगरपालिका,लातूर परिवहन बससेवेमध्ये महिलांना मोफत प्रवास सेवा देणेबाबत मा.परिवहन समीती सभा दिनांक 22/10/2021 तसेच मा. सर्वसाधारण सभा दिनांक 12/10/2021 विषय क्र.13 व ठराव क्र.192 मा. सर्वसाधारण सभा दिनांक 28/02/2022 विषय क्र.10 ठराव क्र.223 अन्वये परिवहन सेवेतील सर्व मार्गावरील सर्व बसमध्ये महिलांना मोफत प्रवास देणेबाबत अभिकर्ता श्रीवरी बिझनेस सर्व्हिसेस प्रा.लि. लातूर यांना दिनांक 14/03/2022 रोजी आदेश देऊन त्याचा मोबदला महिलांना जेवढा प्रवास केला आहे त्या तीकीटातून रॉयल्टी वजा करून उर्वरीत रक्कम अभिकर्त्यास देणेबाबत कळविलेले आहे.

तथापी लातूर शहर महानगरपालिकेमार्फत चालविण्यात येणा-या शहर बस सेवेमध्ये अंदाजे 1200 महिला प्रवास करतील व त्याचा मोबदला अंदाजित खर्च 12,000 रुपये होईल असा अंदाज होता परंतु प्रत्यक्षात सदयस्थितीत प्रतिदिन 10,000 ते 12,000 महिला प्रवास करत असुन त्याचा मोबदला प्रतिदिन 1,00,000 ते 1,20,000 असा होत आहे. सदर खर्च महिला व बालकल्याण निधीतुन करणेचे ठरले आहे.

सदर निधीमध्ये सध्या 30 लक्ष आर्थिक तरतुद केलेली आहे परंतु अभिकर्त्याने सदर मोबदला देयक सादर केलेले असुन त्यानुसार मनपास प्रति महिना अंदाजे रक्कम 36 लक्ष खर्च अपेक्षित आहे.सदर खर्च मनपाची आर्थिक स्थिती पाहता सदर खर्चात कपात करणे गरजेचे आहे त्यामुळे प्रतिदिन प्रतिबस किती महिलांना प्रवास दिला पाहिजे यांचा फेर विचार करणे गरजेचे आहे.तरी प्रकरणी धोरणात्मक निर्णय घेणे बाबत सविनय सादर.

निर्णय -:

उपरोक्त सादर प्रस्तावानुसार लातूर शहर परीवहन बससेवेमध्ये सर्व मार्गावरील सर्व बसमध्ये महिलांना मोफत प्रवास देणेबाबत यापूर्वी तत्कालीन सर्वसाधारण सभेने मंजूरी दिलेनुसार अभिकर्त्यास दिनांक 14.03.2022 च्या आदेशाने कळविले आहे, त्याचा मोबदला रॉयल्टी वजा करुन देण्याचे ठरले होते.

परंतु महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती पाहता दिनांक 18.03.2022 ते 31.06.2022 पर्यंतचा मोबदला रॉयल्टी वजा न करता प्रत्येक बसमध्ये प्रत्येक फेरीकरीता 35 महिला गृहीत धरुन त्यांचे तिकीटाचा दर रु. 10/- प्रति महिला असा देण्यास मंजूरी देण्यात येते.

Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner

तसेच दि. 01.07.2022 पासून महानगरपालिकेने अभिकर्त्याकडुन 06 बसेस प्रादेशिक परीवहन अधिकारी यांनी ठरवुन दिलेल्या भाडेदराप्रमाणे घ्याव्यात त्याचा मोबदला प्रादेशिक परीवहन अधिकारी यांचे दराप्रमाणे व अटी/शर्तीप्रमाणे अदा करण्यासाठी संबंधित अभिकर्त्यासोबत लेखी करार करुन पुढील कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका लातूर

ठराव क्रमांकः- 9 दिनांक 31.05.2022

प्रस्तावः-

मागासवर्गीय कल्याणकरीता योजनेकरीता 5% राखीव निधीच्या खर्चाचा अनुशेषबाबत

मागासवर्गीय कल्याणकरीता योजनेकरीता 5% राखीव निधीचा खर्च प्रत्येक वर्षी होणे आवश्यक आहे, तथापि मागील दोन वर्षाचा कालावधीत कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव असल्याने तसेच त्यापूर्वीच्या तीन वर्षामध्ये कराची वसुलीचे प्रमाण अत्यल्प असल्याने एकुण मागील पाच वर्षामध्ये मागासवर्गीय कल्याणकारी योजनेकरीता 5% राखीव निधीचा खर्च झाला नसल्याचे निदर्शनास आले आहे.

सदरील मागील पाच वर्षाचा कालावधी 2017-18 पासूनचा मागासवर्गीय कल्याणकारी योजनेसाठी 5% राखीव निधीचा अनुशेष येणा-या कालावधीमध्ये या प्रमाणे संपूर्ण अनुशेष भरुन काढणे आवश्यक आहे.

तरी मागासवर्गीय कल्याणकारी योजनेकरीता राखीव 5% राखीव निधीचा मागील पाच वर्षाचा अनुशेष भरून काढणेकरीता निर्णय घेणे बाबत सविनय सादर.

निर्णयः-

उपरोक्त सादर प्रस्तावानुसार मागासवर्गीय कल्याणकरीता योजनेकरीता 5% राखीव निधीचे खर्चाचा विविध कारणांमुळे प्रलंबित सन 2017-18 पासून मागील पाच वर्षाचा अनुशेष येणा-या प्रत्येक वर्षामध्ये मागील एक वर्षाचा अनुशेषाची पुर्तता करणे या प्रमाणे भरुन काढण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका, लातूर

ठराव क्रमांक - 10 दिनांक. 01 /06/ 2022

विषय - लातूर शहर महानगरपालिकेच्या मालकीचे विंधन विहीरीवरील विदयुत पंपास टाईमर बसविणे बाबत.

प्रस्ताव -

लातूर शहर महानगरपालिकेच्या मालकीचे शहरामध्ये एकुण 1028 विंधन विहीरी आहेत. सदर विंधन विहीरीवर विदयुत पंप बसवुन मिनी वॉटर योजनेद्वारे नागरीकांना पाणी पुरवठा केला जातो. सदर योजनेवरील विदयुत पंप नागरीक वेळी अवेळी चालु करीत असतात त्यामुळे विदयुत पंप वारंवार नादुरुस्त होत असल्याने दुरुस्ती खर्च करावा लागत आहे. सदर विदयुत पंपास टाईमर बसविल्यास पंप वेळेत चालू बंद होतील व वारंवार नादुरुस्त होणार नाहीत. तसेच विदयुत पंप दुरुस्तीचा खर्च वाचणार आहे.

शहरातील मनपा मालकीचे विंधन विहीरीवरील एकुण 1028 विदयुत पंपास टाईमर बसविणेसाठी 1,52,84,300.00 रुपये खर्च अपेक्षित आहे. प्रस्तावित कामासाठी जिल्हा नियोजन समिती (DPDC) अंतर्गत निधी मागणी करणे योग्य राहिल.

निर्णय - शहरातील मनपा मालकीचे विंधन विहीरीवरील एकुण 1028 विदयुत पंपास टायमर बसविणे कामासाठी जिल्हा नियोजन समिती (DPDC) अंतर्गत कामे करणे करीता प्रशासकीय मान्यता देण्यात येते.

नगरसचिव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकिय ठराव

लातूर शहर महानगरपालिका, लातूर

ठराव क्रं. ।। **दि. १० /०६ / 2022**

विषय - लातूर शहर पाणी पुरवठा योजना हरंगुळ (BK) व आर्वी जलशुध्दीकरण केंद्रासाठी, तुरटी ग्रेड-1 पुरवठा करणे साठीचे वार्षिक दर निविदा मंजुरी बाबत.

प्रस्ताव -

लातूर शहर पाणी पुरवठा योजने अंतर्गत, जलशुध्दीकरण केंद्रासाठी तुरटी ग्रेड-1 पुरवठा करणेसाठी साल-सन 2022-23 करिता वार्षिक दर ई-निविदा सुचना क्रं. 02/2022-23 मागवण्यात आली होती. निविदा बाबतची सविस्तर माहिती खालील प्रमाणे आहे.

1) प्रथम वेळ दिनांक 09.03.2022 ते 23.03.2022 पर्यंत दिनांक 24.03.2022 मुदतीत किमान निविदा प्राप्त झाले नाही.
2) दुसरी वेळ दि. 04.04.2022 ते 11.04.2022 एक निविदा प्राप्त.
3) प्रथम वेळ मुदतवाढ दि. 11.04.2022 ते 18.04.2022 1 निविदा प्राप्त
4) दुसरी वेळ मुदतवाढ दि. 18.04.2022 ते 25.04.2022 2 निविदा प्राप्त एकुण तीन वेळेस प्रसिध्द करुन दोनच निविदा प्राप्त असल्याने महाराष्ट्र शासन, परिपत्रक क्रं. सीएटी-201[illegible] .क्रं.8/इमा-2, मंत्रालय, मुंबई दि. 29.01.2019 अन्वये निविदेचा प्रथम लिफाफा 27.04.2022 रोजी उघडण्यात आला. प्राप्त 2 निविदा धारकाची कागदपत्र छाननी नंतर दोन्ही वैद्य असल्याने निविदाचा दुसरा अर्थिक लिफाफा दि. 24.05.2022 रोजी उघडण्यात आला.
5) उघडण्यात आलेल्या निविदा दरा बाबत माहिती खालील विवरणामध्ये सादर.

अ.क्रं.	निविदाधारकाचे नांव	संख्या टन	अंदाजपत्रकीय रक्कम रु.	प्राप्त दर
1	मे. जे. के. इंडस्ट्रिज, उस्मानाबाद	400 मे. टन	रु. 35,13,600/-	99 % जास्तीने रु. 69,92,064/-
2	श्री स्वामी समर्थ केमिकल्स, चाकुर			1.10 % जास्तीचे रु. 35,52,249.60/-

वरील प्राप्त दोन निविदा पैकी सर्वात कमीचे निविदा दर रु. 35,52,249.60, 400 मे. टनासाठी असुन रु. 8880.624 Say रु. 8881/- प्रति मे. टनासाठी मे. श्री स्वामी समर्थ केमिकल्स, चाकुर यांचे अंदाजपत्रकीय रक्कम रु. 35,13,600/- दरापेक्षा 1.10% जास्तीचे आहेत.

निर्णय :-

लातूर शहर पाणी पुरवठा योजना हरंगुळ (BK) व आर्वी जलशुध्दीकरण केंद्रासाठी, तुरटी ग्रेड-1 पुरवठा करणेसाठीचे वार्षिक दर निविदाचे निविदाकार श्री स्वामी समर्थ केमिकल्स, चाकुर यांचे सर्वात कमीचे दर 1.10 % जास्तीचे रक्कम रु. 35,52,249.60/- यांस प्रशासकीय मान्यता देण्यात येत [illegible].

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकिय ठराव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

ठराव क्रं. 12 **दि. 20 / 06 / 2022**

विषय - लातूर शहर महानगरपालिका, लातूर पाणी पुरवठा विभागा अंतर्गत कृपासदन शाळे जवळ ग्रीन बेल्ट येथे 3.5 MLD क्षमतेचे जलकुंभ उभारणे बाबत.

प्रस्ताव -

लातूर शहर महानगरपालिका, लातूर पाणी पुरवठा विभागा अंतर्गत कृपासदन शाळेजवळ ग्रीन बेल्ट येथे 3.5 MLD क्षमतेचे जलकुंभ उभारणेच्या कामासाठी ई-निविदा सुचना क्रं. 06 / 2022-23 Tender ID 2022_LMC_786930_1 मागविण्यात आले होते. ई-निविदा बाबतची माहिती खालील तपशिला प्रमाणे आहे.

1. ई-निविदा मागवलेला दि. 05.04.2022 ते 02.05.2022
2. ई-निविदा उघडणेचा दि. 04.05.2022

मुदतीत एकही निविदा प्राप्त न झाल्यामुळे सदर निविदास खालील प्रमाणे मुदतवाढ देण्यात आली.

1. प्रथमवेळ मुदतवाढ दि. 13.05.2022 पर्यंत
2. दुसरी वेळ मुदतवाढ दि. 27.05.2022 पर्यंत

दुस-या मुदतवाढीच्या अंतिम मुदतीत एकुण दोन निविदा प्राप्त झाल्याचे बिड रिपोर्ट वरुन निदर्शनास आले. शासन निर्णय क्रं. सीएटी/2017/प्र.क्रं. 8/इमा-2 मंत्रालय, मुंबई दि. 27.09.2018 मुद्दा क्रं. 4.3 अनुसार मुळ निविदा प्रारुपमध्ये कुठलाही बदल न केल्यास नविन केलेली मागणीही द्वितीय मागणी समजण्यात येईल असे निर्देश आहेत. त्यानुषंगाने प्रस्तावित निविदेस दोन वेळा मुदतवाढ देण्यात आली असल्याने प्राप्त निविदा 1. व्रज कन्स्ट्रक्शन, अहमदाबाद व 2. कृष्णा कन्स्ट्रक्शन कार्पोरेशन अहमदाबाद दोन्ही निविदाचा तांत्रिक लिफाफा उघडण्यात आला. निविदाचे कागदपत्राची छाणणी निविदा समिती सदस्य यांनी केली असता दोन्ही निविदा वैद्य असल्याने निविदाचा अर्थिक लिफाफा उघडण्यात आला. प्राप्त दराचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

अनु क्रं.	निविदाकार	अंदाजपत्रकीय रक्कम	प्राप्त दर
1	वृज कन्स्ट्रक्शन, अहमदाबाद	3,23,15,951/-	19.010% जास्तीचे
2	कृष्णा कन्स्ट्रक्शन कॉर्पोरेशन, अहमदाबाद		25.00% जास्तीचे

Scanned with OKEN Scanner

प्राप्त दोन निविदाचे दरापैकी सर्वात कमीचे दर व्रज कन्स्ट्रक्शन, अहमदाबाद यांचे अंदाजपत्रक रक्कम रु. 3,23;15,951/- पेक्षा 19.010 % जास्तीचे म्हणजे 61,43,262/- रु. आहे. 19.010 % जास्तीने निविदाची एकुण किंमत रु. **3,84,59,213/-** (G.S.T. Excluding) रु. होत आहे. तसेच अध्यक्ष, दरसुची समिती तथा मुख्य अभियंता, मजीप्रा, प्रादेशिक विभाग, पुणे यांचे पत्र क्रं. मु.अ.(पुणे)/विशा/दरसुची 2021-22/शुध्दीपत्रक क्रं. 7, 8 व 9 अनुसार सदरील कामाची किंमत 4,12,43,063/- होत आहे. कंत्राटदारांनी 19.010 % अंदाजपत्रकीय रक्कम रु. 3,23,15,951/- पेक्षा जास्तीने भरलेल्या दराप्रमाणे रु. **3,84,59,213/-** होत आहे.

तरी सुध्दा संबंधीत कामाचे कंत्राटदार यांचे दर मजीप्राचे शुध्दीपत्रकातील दरापेक्षा 8.63 % कमीचे आहेत. व्रज कन्स्ट्रक्शन, अहमदाबाद यांनी निविदा दरा बाबत वाटाघाटीने दर कमी करणेसाठी दि. 03.06.2022 रोजी पत्र देण्यात आले. कंत्राटदार यांचेशी मा. प्रशासक यांचे दालनामध्ये समक्ष वाटाघाटी करण्यांत आले असता प्रस्तावित काम हे सन 2021-22 च्या MJP SSR अनुसार अंदाजपत्रकाप्रमाणे असल्याने व सध्या नविन साहित्याचे दर हे दुपटीने वाढले असल्याने चालु दरसुची प्रमाणे काम करण्यास परवडत नाही त्यामुळे निविदामध्ये भरलेले दर योग्य व वाजवी असल्याचे निविदाकार यांनी चर्चेत सांगितले. वाटाघाटी अंति निविदाकार यांनी भरलेले 19.010 % जास्तीचे दर अंतिम करण्यांत आले. तसे कंत्राटदार यांनी दि. 03.06.2022 रोजी लेखी पत्र सादर केले आहे.

निर्णय :-

लातूर शहर महानगरपालिका, लातूर पाणी पुरवठा विभागा अंतर्गत कृपासदन शाळे जवळ ग्रीन बेल्ट येथे 3.5 MLD क्षमतेचे जलकुंभ उभारणे या कामासाठीचे निविदाकार व्रज कन्स्ट्रक्शन यांचे दरास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. तसेच वाढीव रक्कमेचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांचेकडे पाठवणेस मान्यता देण्यात येते.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकिय ठराव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

ठराव क्रं. 13 **दि. 20/06/2022**

विषय - लातूर शहर महानगरपालिका, लातूर पाणी पुरवठा विभागा अंतर्गत लेबर कॉलनी ग्रीन बेल्ट येथे 1.75 MLD क्षमतेचे जलकुंभ उभारणे बाबत.

प्रस्ताव -

लातूर शहर महानगरपालिका, लातूर पाणी पुरवठा विभागा अंतर्गत लेबर कॉलनी ग्रीन बेल्ट येथे 1.75 MLD क्षमतेचे जलकुंभ उभारणेच्या कामासाठी ई-निविदा सुचना क्रं. 07 / 2022-23 Tender ID 2022_LMC_787023_1 मागविण्यात आले होते. ई-निविदा बाबतची माहिती खालील तपशिला प्रमाणे आहे.

1. ई-निविदा मागवलेला दि. 05.04.2022 ते 02.05.2022
2. ई-निविदा उघडणेचा दि. 04.05.2022

मुदतीत एकही निविदा प्राप्त न झाल्यामुळे सदर निविदास खालील प्रमाणे मुदतवाढ देण्यात आली.

1. प्रथमवेळ मुदतवाढ दि. 13.05.2022 पर्यंत
2. दुसरी वेळ मुदतवाढ दि. 27.05.2022 पर्यंत

दुस-या मुदतवाढीच्या अंतिम मुदतीत एकुण दोन निविदा प्राप्त झाल्याचे बिड रिपोर्ट वरुन निदर्शनास आले. शासन निर्णय क्रं. सीएटी/2017/प्र.क्रं. 8/इमा-2 मंत्रालय, मुंबई दि. 27.09.2018 मुद्दा क्रं. 4.3 अनुसार मुळ निविदा प्रारुपमध्ये कुठलाही बदल न केल्यास नविन केलेली मागणीही द्वितीय मागणी समजण्यात येईल असे निर्देश आहेत. त्यानुषंगाने प्रस्तावित निविदेस दोन वेळा मुदतवाढ देण्यात आली असल्याने प्राप्त निविदा 1. व्रज कन्स्ट्रक्शन, अहमदाबाद व 2. कृष्णा कन्स्ट्रक्शन कार्पोरेशन अहमदाबाद दोन्ही निविदाचा तांत्रिक लिफाफा उघडण्यात आला. निविदाचे कागदपत्राची छाणणी निविदा समिती सदस्य यांनी केली असता दोन्ही निविदा वैद्य असल्याने निविदाचा अर्थिक लिफाफा उघडण्यात आला. प्राप्त दराचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

अनु क्रं.	निविदाकार	अंदाजपत्रकीय रक्कम	प्राप्त दर
1	वृज कन्स्ट्रक्शन, अहमदाबाद	1,86,22,981/-	18.750% जास्तीचे
2	कृष्णा कन्स्ट्रक्शन कॉर्पोरेशन, अहमदाबाद		25.00% जास्तीचे

Scanned with OKEN Scanner

प्राप्त दोन निविदाचे दरापैकी सर्वात कमीचे दर व्रज कन्स्ट्रक्शन, अहमदाबाद यांचे अंदाजपत्रक रक्कम रु. 1,86,22,981/- पेक्षा 18.750 % जास्तीचे म्हणजे रु.34,91,808.93 आहे. 18.750 % जास्तीने निविदाची एकुण किमत रु. 2,21,14,790/- (G.S.T. Excluding) रु. होत आहे. तसेच अध्यक्ष, दरसुची समिती तथा मुख्य अभियंता, मजीप्रा, प्रादेशिक विभाग, पुणे यांचे पत्र क्रं. मु.अ.(पुणे)/चिशा/दरसुची 2021-22/शुध्दीपत्रक क्रं. 7, 8 व 9 अनुसार सदरील कामाची किमत 2,34,34,168/- होत आहे. कंत्राटदारांनी 18.750 % अंदाजपत्रकीय रक्कम रु. 1,86,22,981/- पेक्षा जास्तीने भरलेल्या दराप्रमाणे रु. **2,21,14,790/-** होत आहे. तरी सुध्दा संबंधित कंत्राटदाराचे दर मजीप्राचे शुध्दीपत्रकापेक्षा 7.1 % कमीचे आहेत. व्रज कन्स्ट्रक्शन, अहमदाबाद यांनी निविदा दरा बाबत वाटाघाटीने दर कमी करणेसाठी दि. 03.06.2022 रोजी पत्र देण्यात आले. कंत्राटदार यांचेशी मा. प्रशासक यांचे दालनामध्ये समक्ष वाटाघाटी करण्यांत आले असता प्रस्तावित काम हे सन 2021-22 च्या MJP SSR अनुसार अंदाजपत्रकाप्रमाणे असल्याने व सध्या नविन साहित्याचे दर हे दुपटीने वाढले असल्याने चालु दरसुची प्रमाणे काम करण्यास परवडत नाही त्यामुळे निविदामध्ये भरलेले दर योग्य व वाजवी असल्याचे निविदाकार यांनी चर्चेत सांगितले. वाटाघाटी अंति निविदाकार यांनी भरलेले 18.750 % जास्तीचे दर अंतिम करण्यांत आले. तसे कंत्राटदार यांनी दि. 03.06.2022 रोजी लेखी पत्र सादर केले आहे.

निर्णय :-

लातूर शहर महानगरपालिका, लातूर पाणी पुरवठा विभागा अंतर्गत लेबर कॉलनी ग्रीन बेल्ट येथे 1.75 MLD क्षमतेचे जलकुंभ उभारणे या कामासाठीचे निविदाकार व्रज कन्स्ट्रक्शन यांचे दर मान्यतेस्तव तसेच वाढीव रक्कमेचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांचेकडे पाठवणेस मान्यता देण्यात येते.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका लातूर

ठराव क्रमांकः- 14 दिनांक 20 / 06 / 2022

प्रस्तावः-

शाहू चौक येथे छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचा पूर्णाकृती पुतळा बसविणेस मान्यता मिळणे बाबत.

छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचा ०९ फुट उंचीचा ब्रॉन्झ धातूचा पुर्णाकृती पुतळा तयार आहे. सदर पुतळा शाहू चौक, लातूर येथील विद्यमान अर्धाकृती पुतळा ऐवजी पुर्णाकृती पुतळा बसविणेसाठी मा. जिल्हाधिकारी, लातूर यांची मान्यता घेणे आवश्यक आहे.

तरी शाहू चौक येथे छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचा ०९ फुट उंचीचा ब्रॉन्झ धातूचा पुर्णाकृती पुतळा बसविणेकरिता निर्णय घेणे बाबत सविनय सादर.

निर्णयः-

उपरोक्त सादर प्रस्तावानुसार शाहू चौक येथे छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचा ०९ फुट उंचीचा ब्रॉन्झ धातूचा पुर्णाकृती पुतळा बसविणे करिता याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकिय ठराव

लातूर शहर महानगरपालिका, लातूर

ठराव क्रं. 15 **दि.** 23 / 06 / **2022**

विषय - हरंगुळ जलशुध्दीकरण केंद्र येथील फिल्टर बेड मधील फिल्टर मिडीया बदलणे या कामाचे वाढीव रक्कमेस प्रशासकी मान्यता देणे बाबत.

प्रस्ताव -

लातूर शहर पाणी पुरवठा योजना, हरंगुळ जलशुध्दीकरण केंद्र येथील फिल्टर बेड मधील फिल्टर मिडीया बदलणे या कामाचे आदेश क्रं. 3781 दिनांक 08.06.2022 रोजी व्रज कन्स्ट्रक्शन, अहमदाबाद यांना देण्यात आले आहेत. अंदाजपत्रकातील तरतुदीनुसार गोकक, कर्नाटक येथून घेणे प्रस्तावित होते. परंतू कर्नाटक राज्यात खोदकामावर बंदी असल्यामुळे तेथुन फिल्टर मिडीया आणणे शक्य झाले नाही. सदरचा फिल्टर मिडीया गोदरा, गुजरात राज्यातुन घेणेसाठी साधारणतः 400 कि.मी. जास्तीचे अंतर होत असल्याने अंदाजपत्रकीय दरानुसार रक्कम रु. 66,46,403/- होत आहेत.

निर्णय :-

हरंगुळ जलशुध्दीकरण केंद्र येथील फिल्टर बेड मधील फिल्टर मिडीया बदलणे या कामाची वाढीव रक्कम रु. 66,46,403/- यांस प्रशासकीय मान्यता देण्यात येत असुन सदरचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, यांच्याकडे पाठविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

Scanned with OKEN Scanner

लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

सार्वजनिक बांधकाम विभाग

मा. सर्वसाधारण सभा तथा मा. प्रशासकीय विषय क्र. 16 ठराव क्र. 16 दि. 28/०६/2022

विषय :- लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी अनुसुचित जाती व नवबौद्ध वस्ती सुधार योजना अंतर्गत कामे निवड व निश्चिती करणे बाबत.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी अनुसुचितजाती व नवबौद्ध वस्ती सुधार योजना सन २०२२-२३ सालाकरीता लातूर शहर महानगरपालिकेस लोकसंख्योच्या प्रमाणात रु. २५.०० कोटी (अक्षरी रुपये पंचवीस कोटी) इतका नियतव्यय मंजूर होऊ शकतो. या सन २०२२-२३ साठी प्राप्त होणारे निधीमधून मा. सर्वसाधारण सभेत कामाची निवड व निश्चिती करणे आवश्यक आहे.

शासन निर्णय क्र. विघयो-१०२०००/१५९२/प्र.क्र.१८९/नवि-८ दि. ५ मार्च २००२ नुसार "लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलीतवस्ती सुधारणा योजना"अंतर्गत रस्ते, पोच-रस्ते, जोड-रस्ते, रस्त्याचे डांबरीकरण, सिमेंटीकरण (अत्यंत अपवादात्मक परिस्थितीत वस्त्यांकरीता कच्चे रस्ते), नाली बांधकाम, लहान नाल्यावर फरशी बांधणे, विहीर दुरुस्ती तसेच उघड्या विहीरीवर कठडे बांधणे, नदीच्या काठावर अथवा डोंगर उतारावर संरक्षक भिंती तसेच कठडे बांधणे, मोठे पुल, पिण्याच्या पाण्यासाठी सोयी सुविधा (हापसा, पाण्याची टाकी), सार्वजनिक उपयोगासाठी मुता-या व शौचालये बांधणे, रस्त्यावरील विजेचे दीवे, बालवाडी, बगीचे, बगीच्यामध्ये पक्क्या स्वरुपाचे बसवायचे खेळाचे साहित्य, समाज मंदीर, वाचनालय, व्यायामशाळा, दवाखाने, सांस्कृतिक केंद्रे, दुकाने, स्मशानभूमीचा विकास इ. कामे दलित वस्त्यांमध्ये करणे अनुज्ञेय आहेत. त्यानुसार खालील कामे निश्चित करण्यात आली आहेत.

अ.क्र.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय किंमत
१	प्र.क्र. १२ सय्यद नगर येथे महादेव काशनाथ साबळे, धोंडीराम वाघमारे, अनिल कांबळे, तुकाराम रसाळ, वैजनाथ कांबळे, बालाजी सुर्यवंशी, अभिजीत हजारे, प्रकाश कांबळे, विद्यानंद थोरात व इतर ठीकाणी सी.सी. रोड करणे.	५०,००,०००.००
२	प्र.क्र. १२ मध्ये विविध ठीकाणी पेव्हर रोड करणे.	७५,००,०००.००
३	प्र.क्र. १ नांदगाव वेस, पटेल चौक येथे सभागृह बांधकाम करणे.	२०,००,०००.००
४	प्र.क्र. ६ गांधी नगर हरनाळे यांचे घर ते वाघमारे यांचे घर रस्ता करणे.	१०,००,०००.००
५	प्र.क्र. ०६ गांधी नगर इंगळे यांचे घर ते डांगरे यांचे घर नाली करणे.	१०,००,०००.००
६	प्र.क्र. ६ गांधी नगर गालफाडे यांचे घरासमोरील रोड व नाली करणे.	१०,००,०००.००
७	प्र.क्र. १२ विठ्ठल रुक्मीनी नगर संगम पार्क समोर रस्ता करणे.	१०,००,०००.००
८	प्र.क्र. १६ दलीत वस्तीमध्ये बुद्ध गार्डन ते सुरेश कांबळे रस्ता करणे.	१०,००,०००.००
९	प्र.क्र. १६ महापुरे यांचे घर ते जवाहरलाल शाळा रस्ता करणे.	१०,००,०००.००
१०	प्र.क्र. १६ कॉईल नगर सुरवसे किराणा ते गव्हाणे हॉस्पिटल रस्ता करणे.	१५,००,०००.००
११	प्र.क्र. १६ एस.एस.सी. बोर्ड ते बोथे नगर मस्जिद डांबरीकरण करणे.	१०,००,०००.००
१२	प्र.क्र. १८ माताजी नगर हबीब शेख ते रोहीत कांबळे यांचे घर रस्ता व नाली	१०,००,०००.००

Scanned with OKEN Scanner

	करणे.	
१३	प्र.क्र. १८ माताजी नगर गोखले रत्नदीप यांचे घर ते वामन कांबळे घर रस्ता करणे.	१०,००,०००.००
१४	प्र.क्र. १८ दुर्गादेवी चौक ते वामन कांबळे घर रस्ता व नाली करणे.	१०,००,०००.००
१५	प्र.क्र. १८ माताजी नगर मिनार ऊर्दु शाळा समोरील रस्ता व नाली करणे.	१०,००,०००.००
१६	प्र.क्र. १८ नागु गायकवाड यांचे घर ते राहुल घोडके रस्ता व नाली करणे.	१०,००,०००.००
१७	बोधी चौक ते पंचशील चौक डांबरीकरण करणे.	२०,००,०००.००
१८	विक्रम नगर मस्के सरांचे घरासमोर बौद्ध विहार विकसीत करणे.	२५,००,०००.००
१९	विक्रम नगर कैलास कांबळे यांचे घराजवळ सी.सी. रोड करणे.	४०,००,०००.००
२०	विक्रम नगर ओव्हळ ते बँक कॉलनी रस्ता डांबरीकरण करणे.	३५,००,०००.००
२१	गोरोबा सोसायटी येथे बालाजी नगर सोनवणे घर ते मस्जिद सी.सी. रोड करणे.	५०,००,०००.००
२२	बालाजी नगर सय्यद सत्तार घरापासून आशाबाई चौरे सी.सी. रस्ता करणे.	४५,००,०००.००
२३	सोना नगर चव्हाण ते स्वामी घर रस्ता करणे.	५५,००,०००.००
२४	प्र.क्र. ०२ गवळी नगर, मोहन नगर परीसरातील रस्ते व नाल्या करणे.	१०,००,०००.००
२५	प्र.क्र. ०७ लिंबूनी बौद्ध विहार, वैशाली बौद्ध विहार, सिद्धार्थ सोसायटी बौद्ध विहार, माता रमाई नगर व सम्राट अशोक चौक येथे हेरीटेज लाईट बसविणे.	२०,००,०००.००
२६	सोना नगर, कुलस्वामीनी नगर येथे साई शाळेजवळ कै. विलासरावजी देशमुख व कै. गोपीनाथजी मुंडे यांच्या नावाने पार्क विकसीत करणे.	६५,००,०००.००
२७	डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह विकसीत करणे.	१,००,००,०००.००
२८	नांदगाव वेस स्मशानभूमी विकसीत करणे.	८०,००,०००.००
२९	प्र.क्र. ०२ मध्ये विविध ठीकाणी रस्ते विकसीत करणे.	५०,००,०००.००
३०	विवेकानंद चौक ते गरुड चौक दोन्ही बाजूने सायकलींग ट्रॅक विकसीत करणे.	१,००,००,०००.००
३१	प्र.क्र. १३ विकास नगर येथे सौदागर डी.पी. ते गवळी, सितापे, पिडगे, बनसोडे, लॉर्ड बुद्ध विहार येथे सी.सी. रोड करणे.	२५,००,०००.००
	एकूण रुपये	१०,००,००,०००.००

तरी वरीलप्रमाणे अंदाजपत्रकीय रक्कम रु. १०,००,००,०००/- च्या एकूण ३१ कामांना मान्यता देण्यात येत आहे. शहर अभियंता (बांधकाम) यांनी या प्रशासकीय ठरावानुसार त्वरीत कार्यवाही करावी.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

प्रशासक,
लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

Scanned with OKEN Scanner

प्रशासकिय ठराव

लातूर शहर महानगरपालिका, लातूर

ठराव क्रं. 17 **दि. 29 / 06 / 2022**

विषय - लातूर शहरामध्ये नविन दोन जलकुंभ उभारणेच्या कामाबाबत.

प्रस्ताव -

लातूर शहराचे क्षेत्रफळ 35 चौ.किमी असुन लातूर शहराची सध्याची लोकसंख्या सुमारे 5 लाख इतकी आहे. शहरामध्ये एकुण 11 जलकुंभ असुन नविन दोन जलकुंभ उभारणेचे काम प्रगती पथावर आहे. शहरातील नागरीकांना पुरेसा व उच्च दाबाने पाणी पुरवठा होण्याचे दृष्टीने शहरात आणखी दोन जलकुंभाची आवश्यकता आहे. त्याअनुषंगाने लातूर शहरामध्ये 1) SSC बोर्ड कार्यालय ग्रीन बेल्ट 2)बसव कॉलनी , खाडगाव रोड, ग्रीन बेल्ट येथे नवि[illegible]न जलकुंभ उभारणेचे काम हाती घ्यावयचे आहे. प्रस्तावित कामासाठी 8.11 कोटी रुपये अंदाजीत खर्च अपेक्षितआहे. प्रस्तावित कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. SSC बोर्ड कार्यालय ग्रीन बेल्ट येथील 3.00 MLD क्षमतेचे जलकुंभास रु 4,67,94,433.00 व बसव कॉलनी ग्रीन बेल्ट येथील 2.5 MLD क्षमतेचे जलकुंभास रु3,43,05,272.00 एवढा खर्च आपेक्षित आहे. शहरामध्ये नविन जलकुंभ उभारले नंतर नागरीकांना पुरेसा व उच्च दाबाने पाणी पुरवठा होणार आहे.

प्रस्तावित नविन दोन जलकुंभ उभारणेचे काम नागरी दलितेत्तर वस्ती सुधार योजना (जिल्हारस्तर) अंतर्गत प्रस्ताव सादर करुन निधी मागणी करणे योग्य राहिल. तरी शहरामध्ये नविन दोन जलकुंभ उभारणेच्या कामासाठीचा विषय प्रशासकिय मान्येतस्तव व निर्णयास्तव सादर.

निर्णय :-

लातूर शहरामध्ये एस.एस.सी. बोर्ड जवळील ग्रीन बेल्ट येथे 3.0 MLD क्षमतेचे जलकुंभ उभारणे व बसव कॉलनी, खाडगांव रोड जवळील ग्रीन बेल्ट येथे 2.5 MLD क्षमतेचे जलकुंभ उभारणे या कामासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात येते. तसेच जलकुंभ उभारणेसाठी नागरी दलित्तेतर वस्ती सुधार योजना (जिल्हास्तर) अतंर्गत प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, यांच्याकडे पाठविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका लातूर

ठराव क्रमांक:- 18 दिनांक 29 / ०९ / 2022

विषय:-जन हिताच्या / उपयोगी कामांच्या मागणी/विनंती पत्रावर योग्य ती कार्यवाही होणे बाबत.
विकास कार्यक्रमांतर्गत सन २०२२-२३ मध्ये विकास कामांना मंजूरी देणे बाबत.

संदर्भ:- १) मा.ना.डॉ.भागवत कराड, केंद्रीय अर्थ राज्यमंत्री, भारत सरकार यांचे पत्र क्र.OU-573/2022-23 दि. 29.05.2022
२) जिल्हा नियोजन अधिकारी,जि.नि.स.,जि.का.लातूर यांचे पत्र क्र.२०२२-२३/जिनिस-ला/जिवायो/ संकिर्ण/१२९७ दि.०७.०६.२०२२.
३) जिल्हा सह आयुक्त, नपाप्र., जि.का.लातूर यांचे पत्र क्र.२०२२/नपाप्र/जिवायो/कावि-दि.१७.०६.२०२२

प्रस्तावना-

मा.ना.डॉ.भागवत कराड, केंद्रीय अर्थ राज्यमंत्री, भारत सरकार यांनी प्र.क्र.१२ मधील खालील विकास कामांना विकास कार्यक्रमांतर्गत सन २०२२-२३ अंतर्गत मंजूरी देणे बाबत शिफारस केली आहे.

अ.क्र.	कामाचे स्वरूप	अंदाजित रक्कम (लाखात)
१.	गिरवलकर नगर सोमशेट्टे सर ते माऊली मंदीर हा रस्ता तयार करणे.	१०.००
२.	सोना नगर येथे थोरात, काळे यांच्या घरासमोरील रस्ता तयार करणे.	१०.००
३.	कुलस्वामीनी नगर येथे नाली तयार करणे.	१०.००
४.	सोनानगर येथे सुलाखे व पवार यांच्या घरासमोरील रस्ता करणे.	१०.००
५.	आमलेश्वर नगर येथे नाली तयार करणे.	१०.००
६.	पंचवटी नगर येथे रस्ता तयार करणे.	१०.००
७.	चौधरी नगर येथे रस्ता तयार करणे.	१०.००
८.	शफी पैंटर यांच्या घरासमोरील रस्ता तयार करणे.	१०.००
९.	बरडे यांच्या घरासमोरील रस्ता तयार करणे.	१०.००
१०.	शेटकार यांच्या घरासमोरील रस्ता तयार करणे.	१०.००
११.	शेटे इंजिनियर यांच्या घरासमोर नाली व रस्ता तयार करणे.	१०.००
१२.	विठ्ठल रुक्मीणी नगर येथे माऊली मंदीर ते बगरे यांच्या घरासमोर नाली तयार करणे.	१०.००
१३.	गंगानगर येथे नाली तयार करणे.	१०.००
१४.	पठाण नगर येथे रस्ते तयार करणे.	१०.००
१५.	न्यू आरक्षनगर येथील बौध्द विहाराला संरक्षित भिंत तयार करणे.	१०.००
	एकुण-	१५०.००

जिल्हा सह आयुक्त, न.पा.प्र. यांनी संदर्भ क्र.०३ अन्वये सन २०२२-२३ च्या विकास कार्यक्रमांतर्गत अनुज्ञेय निधीच्या मर्यादेत विहीत नमुन्यातील प्रस्ताव अंदाजपत्रक, तांत्रिक मान्यता, प्रशासकीय ठराव इतर सर्व आवश्यक त्या कागदपत्रासह प्रस्ताव पाठविणेची विनंती केली आहे.

Scanned with OKEN Scanner

जिल्हा नियोजन समितीकडून जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत महानगरपालिकेस नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजना, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना अंतर्गत सन २०२२-२३ साठी नियतव्यय मंजूर होतो.

सदरची कामे कोणत्या योजनेतून प्रस्तावित करावीत याबाबत निर्णय घेणेसाठी सविनय सादर.

निर्णयः-

उपरोक्त सादर केलेल्या प्रस्तावानुसार प्र.क्र.१२ मधील प्रस्तावित १५ कामे जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत सन-२०२२-२०२३ साठी महानगरपालिकेस नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजना, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना अंतर्गत मंजूर नियतव्ययातून खालील प्रमाणे योजनानिहाय कामे हाती घेण्यास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे.

(रु.लाखात)

अ.क्र.	कामाचे स्वरुप	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (रस्तजिल्हा) योजना	नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजना	लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना
१.	गिरवलकर नगर सोमवेट्टे सर ते मारुती मंदीर हा रस्ता तयार करणे.	१०.००	-	-
२.	सोना नगर येथे थोरात, काळे यांच्या घरासमोरील रस्ता तयार करणे.	१०.००	-	-
३.	कुलस्वामीनी नगर येथे नाली तयार करणे.	१०.००	-	-
४.	सोनानगर येथे सुलाखे व पवार यांच्या घरासमोरील रस्ता करणे.	१०.००	-	-
५.	आमलेश्वर नगर येथे नाली तयार करणे.	१०.००	-	-
६.	पंचवटी नगर येथे रस्ता तयार करणे.	१०.००	-	-
७.	चौधरी नगर येथे रस्ता तयार करणे.	-	१०.००	-
८.	शफी पैंटर यांच्या घरासमोरील रस्ता तयार करणे.	-	१०.००	-
९.	बरडे यांच्या घरासमोरील रस्ता तयार करणे.	-	१०.००	-
१०.	शेटकार यांच्या घरासमोरील रस्ता तयार करणे.	-	१०.००	-
११.	शेटे इंजिनियर यांच्या घरासमोर नाली व रस्ता तयार करणे.	-	१०.००	-
१२.	विठ्ठल रुक्मीणी नगर येथे मारुती मंदीर ते बगरे यांच्या घरासमोर नाली तयार करणे.	-	१०.००	-
१३.	गंगानगर येथे नाली तयार करणे.	-	१०.००	-
१४.	पठाण नगर येथे रस्ते तयार करणे.	-	१०.००	-
१५.	न्यू भाग्यनगर येथील बौध्द विहाराला संरक्षित भिंत तयार करणे.	-	-	१०.००

नगर सचिव,
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

प्रशासक,
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका,लातूर

ठराव क्रमांक-१७ **दिनांक३०/०६/२०२२**

प्रस्ताव:-

लातूर शहर महानगरपालिकेच्या ग.नं / सर्वे नं. मौजे खाडगाव, वरंवटी, बसवंतपुर,आर्वी, व वासनगाव हद्दवाढी संदर्भात अंतर्भूत करणेसाठी व महानगरपालिकेच्या शहरी भागाची सिमा निश्चितीसाठी अवर सचिव,महाराष्ट्र शासन यांच्या पत्रावर विचार विनमय करून निर्णय घेणे बाबत.

संदर्भ:- लामपा-२०१७/प्र.क्र.१३५/नवि-२४ दिनांक २० जून २०२२ रोजीची पत्र

विषयांकित प्रकरणी लातूर शहर महानगरपालिके हद्दवाढी संदर्भात दि.१३ ऑक्टोबर २०२१ रोजी राजपत्र प्रसिध्द करण्यात आलेले होते.तसेच नमुद राजपत्रातील महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९(सन १९४९ चा ५९) च्या कलम ३ चे पोट- कलम (३)चे खंड (अ) मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासनाने याव्दारे लातूर शहराच्या सीमांमध्ये फेरफार करण्याच्या उद्देशाने उक्त कलम ३ च्या पोट-कलम (४) नुसार बाधित होणा-या संभाव्या आसणा-या व्यक्तीच्या माहितीसाठी मसुदा प्रसिध्द करण्यात येऊन हरकती व सूचना शासनाकडे मागविण्यात आल्या होत्या.व संदर्भीय पत्रान्वये आपेक्षीलेला अहवाल दि.११/०१/२०२२ रोजीच्या त्याअनुषंगाने लातूर शहर महानगरपालिकेच्या मंजूर नकाशानुसार राजपत्रमध्ये खालील ग.नं / सर्वे नं गावठाण हे समाविष्ठ न झालेल्या असल्याने लातूर शहर महानगरपालिकेने पत्र क्र.जा.क्र.लाशमनपा/नरवि/७४९०/ दि.२८/१०/२०२१ रोजी सुचना / हरकत घेण्यात आलेले होती.त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी,लातूर यांच्याकडे दि.११/०१/२०२२ रोजी प्रत्यक्ष सुनावणी घेण्यात आलेली आहे.त्यात खालील प्रमाणे ग.नं/ सर्वे नं.चा उपविभागाचा गावठाणासह प्रस्तावात समावेश करण्यात यावा.असे म्हणणे मांडलेले आहे.

महाराष्ट्र शासन राजपत्रात राजपत्रात प्रसिध्द झालेल्या अधिसुचना क्र.लामनपा २०१७/प्र.क्र १३५/ नवि - १३ ऑक्टोंबर २०२१ मध्ये प्रसिध्द करण्यात आलेल्या राजपत्रातील अनुसूची एक मध्ये

१.खाडगाव गावठाण सर्वे नंबर ६३ पैकी सध्या फक्त गावठाणचा समावेश अधिसुनेत करण्यात यावा कारण जुन्या हद्दवाढ दि.१६/०८/१९८८ प्रमाणे यापुर्वीच सर्वे नंबर ६३ यांचा समावेश करण्यात आलेला आहे.

२.मौजे वरवंटी गावठाण व सर्वे नंबर ८१ ते ८३ आहेत .त्याप्रमाणे गट नंबर ८१ हा नविन हद्दवाढीमध्ये समाविष्ठ करण्यात यावे सदरील सर्वे नंबर/ गट नंबरचे उपविभागासह म्हणजेच गट नंबर ८१/१, ८१/२ असे सर्व हद्दीमध्ये समाविष्ठ करणे योग्य आहे.तसेच त्याप्रमाणे यापुर्वीच गट नं ८२,८३,८४ जुन्या हद्दीमध्ये समाविष्ठ करण्यात आले आहे.

३.मौजे बसवंतपुर गावठाण व गट नंबर / उपविभागासह २२ ते ३३ हे सर्व समाविष्ठ करणे योग्य आहे.

४.मौजे आर्वी गावठाण व गट नंबर / उपविभागासह ३७,४९ ते ६० हे नविन हद्दवाढीमध्ये समाविष्ठ करण्यात यावे.

५.मौजे वासनगांव गावठाण व गट नंबर उपविभागासह ३७,०३ उपरोक्त प्रमाण या गट नंबरचा / उपविभागासह गावठाणासह प्रस्तावात समावेश करण्यात यावा.

अवर सचिव,महाराष्ट्र शासन यांच्या पत्रा क्र. पत्र क्र.लामनपा-२०१७/प्र.क्र.-१३५/नवि-२४ दि.२०/०६/२०२२ मध्ये उक्त सर्वे नबर लातूर शहर महानगरपालिकेच्या सर्वसाधरण सभा दिनांक ०४/०४/२०१५ च्या ठराव क्र.-२७ नुसार हद्दवाढीचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे.या ठरावामध्ये उक्त सर्वे नंबर / गट नंबर / अंतर्भुत असल्याचे प्रमाणित करावे व नसल्यास सुधारीत ठराव करून त्यानुसार शासनास कळवावे असे काळविलेले आहे.त्यामुळे अंतर्भुत करून सुधारीत ठराव अपेक्षिलेला आहे. त्याअनुषंगाने ठराव क्र.२७ दि.०४/०४/२०१५ रोजीच्या ठरावाप्रमाण सदरील गावठाण व गट नं. / सर्वे नं गावठाणाचा वा उल्लेख ठरावात दिसुन येत नाही.त्यामुळे लातूर

Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner

महानगरपालिकेच्या शहर आगाची सुधारीत सीमा निश्चीत करण्यासाठी यापुर्वीच्या हद्दवाढीच्या प्रस्तावित क्षेत्रातील नजर चुकीने राहिलेले सर्वे नं. / गट नंबर व गावठाण मागिल प्रस्तावित हद्दवाढीचे क्षेत्र ,सिमा न बदल करता प्रस्ताया मध्ये अंतर्भूत करणे योग्य असून सुधारीत ठराव करून त्यानुसार ग.नं / सर्वे नं अंतर्भूत करण्यासाठी विचार विनयम करून निर्णय घेणस्तव सादर.

निर्णय:- लातूर शहर महानगरपालिकेच्या हद्दवाढीचे संदर्भात अधिसुचना महाराष्ट्र शासने १३ ऑक्टोबर २०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आलेले आहे.राजपत्रातील गट नंबर / सर्वे नंबर व गावठाणसह अनुसुची एक मध्ये मौजे खाडगाव मौज वरवंटी ८१/१ ८१/२ मौजे आर्वी गावठाण व गट नंबर / सर्वे नंबर, मौजे बसवंतपुर गावठाण व गट नंबर / सर्वे नंबर २२ ते ३३, मौजे वासनगांव गावठाण गट नंबर / सर्वे नंबर ०३,३७ हे समाविष्ठ न करता प्रसिध्द करण्यात आले होते.त्यामुळे महाराष्ट्र शासनाकडे उक्त गावठाणसह गट नंबर/ सर्वे नंबर हे मंजूर नकाशातील हद्दीमधील गट नंबर / सर्वे नंबर असल्यामुळे सदर प्रकरणी सुचना व हरकत घेण्यात आलेली होती. त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी,लातूर यांच्याकडे दि.११/०१/२०२२ रोजी प्रत्यक्ष सुनावणी घेण्यात आलेली आहे. सदर सुनावणी मधील अभिप्राय प्रमाणे खालील सर्वे नंबर / गट नंबर / गावठाण समाविष्ठ करण्यात येते.

१.खाडगाव गावठाण सर्वे नं मध्या गावठाणचा समावेश अधिसुचनेत करण्यात बाबा कारण जुन्या हद्दवाढ दि.१६/०८/१९८८ प्रमाणे यापुर्वीच सर्वे नंबर ६३ यांचा समावेश करण्यात आलेला आहे.

२.मौजे वरवंटी गावठाण सर्वे नंबर ८१ ते ८३ च्या पत्रमध्ये उल्लेख केलेले नंबर ते सर्वे नंबरचे नुसार गट नंबरचे आहे.त्याप्रमाणे सर्वे नंबर ८१ हा नविन हद्दवाढीमध्ये समाविष्ठ करण्यात यावे सदरील सर्व गट नंबरचे उपविभागासह म्हणजेच गट नंबर ८१/१, ८१/२ असे सर्व हद्दीमध्ये समाविष्ठ करणे योग्य आहे.तसेच त्याप्रमाणे यापुर्वीच गट नं ८२,८३,८४ जुन्या हद्दीमध्ये समाविष्ठ करण्यात आले आहे.

३.मौजे बसवंतपुर गावठाण व गट नंबर / उपविभागासह २२ ते ३३ हे सर्व समाविष्ठ करणे योग्य आहे.

४.मौजे आर्वी गावठाण गट नंबर / उपविभागासह ३७,४९ ते ६० हे नविन हद्दवाढी प्रस्तावात समाविष्ठ करण्यात यावे.

५.मौजे वासनगांव गावठाण व गट नंबर उपविभागासह ३७,०३ उपरोक्त प्रमाण या गट नंबरचा / उपविभागासह गावठाणासह प्रस्तावात समावेश करण्यात यावा.

सदर लातूर शहर महानगरपालिकेचा सर्वसाधरण सभा ठराव क्र. २७ दि.०४/०४/२०१५ मधील अनुसुची मध्ये उक्त प्रमाणे गावठाणसह गट नंबर / सर्वे नंबर प्रस्ताय अंतभूत करायायचे नजर चुकीने महानगरपालिके कडून राहिलेले होते.ठराव क्र.२७ दि.०४/०४/२०१५ ठराव व प्रस्ताव पत्र क्र.लाशमनपा/नरवि ६८७४/२०१५-१६ दि.२१/०७/२०१६ कायम ठेऊन महानगरपालिकेच्या नजर चुकीने राहिलेल गावठाण गट नंबर / सर्वे नंबर या यापुर्वीच हद्दवाढीमध्ये समाविष्ठ केलेले होते.शासनास सादर केले यापुर्वीचा हद्दवाढीतील क्षेत्र गावठाण,गट नंबर/सर्वे नंबर हे यापुर्वीच्या सीमा मध्ये बदल न करता सदरचे नजर चुकीने राहिलेले गावठाण गट नंबर / सर्वे नंबर हे अधिसुचनेत समाविष्ठ करण्यात यावे.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

45

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका लातूर

ठराव क्रमांकः-20 दिनांक 14.07.2022

प्रस्तावः-

विषयः- अंतर्गत लेखापरीक्षण क्षमापन प्रस्ताव

लातूर शहर महानगरपालिकेच्या मंजूर आकृतीबंधानुसार सन2011-12, 2012-13, 2013-14 व 2014-15 मध्ये मुख्य लेखापरीक्षक, सहाय्यक लेखापरीक्षक व कनिष्ठ लिपिक ही पदे रिक्त होती, त्यामुळे अंतर्गत लेखापरीक्षणाची कामे नियमितपणे होऊ न शकल्याने सदर कामे प्रलंबित राहीली होती. तथापि दि. 29/04/2015 रोजी मुख्यलेखापरीक्षक, दि.19/08/2017 रोजी सहाय्यक लेखापरीक्षक व दि. 18/09/2017 रोजी लिपिक पदे भरली आहेत. त्यानंतर अंतर्गत लेखापरीक्षणाचे कामकाज नियमितपणे सुरू करण्यात आलेले आहे.

अंतर्गत लेखापरीक्षण विभागातील पदे 2015 पर्यंत रिक्त असल्याने सन 2011-12, 2012-13, 2013-14 व 2014-15 लेखापरीक्षण करता येणे शक्य न झाल्याने सदर बाबीस क्षमापन देऊन कार्योत्तर मंजूरी प्रदान करणेस्तव सादर.

निर्णयः-

लातूर शहर महानगरपालिकेच्या मंजूर आकृतीबंधानुसार सन 2011-12, 2012-13, 2013-14 व 2014-15 मध्ये मुख्य लेखापरीक्षक, सहाय्यक लेखापरीक्षक व कनिष्ठ लिपिक ही पदे रिक्त होती, त्यामुळे अंतर्गत लेखापरीक्षणाची कामे नियमितपणे होऊ न शकल्याने सदर कामे प्रलंबित राहीली होती. परंतु दि. 29/04/2015 रोजी मुख्यलेखापरीक्षक, दि.19/08/2017 रोजी सहाय्यक लेखापरीक्षक व दि. 18/09/2017 रोजी लिपिक पदे भरल्यानंतर अंतर्गत लेखापरीक्षणाचे कामकाज नियमितपणे सुरू करण्यात आलेले आहे.

अंतर्गत लेखापरीक्षण विभागातील पदे 2015 पर्यंत रिक्त असल्याने अंतर्गत लेखापरीक्षणाचे कामकाज प्रलंबित होते त्यामुळे सन 2011-12, 2012-13, 2013-14 व 2014-15 मधील लेखापरीक्षण करता येणे शक्य न झाल्याने सदर बाबीस क्षमापन देऊन कार्योत्तर मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका, लातूर

ठराव क्र. 21 दिनांक 14/7/२०२२

विषय: जन हिताच्या/उपयोगी कामांच्या मागणी/विनंती पत्रावर योग्य ती कार्यवाही करणे बाबत

संदर्भ: मा.जिल्हा सह आयुक्त, नगर पालिका प्रशासन शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर यांचे पत्र क्र.२०२२/नपाप्र/जियायो/२०२०-२१/कावि दि.१०/०२/२०२२

प्रस्तावना: संदर्भीय पत्रान्वये मा.जिल्हा नियोजन अधिकारी यांनी मा.मंत्री, वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचे विशेष कार्य अधिकारी यांनी श्री हकीम अजिरहमजा शेख, अध्यक्ष, संजय गांधी निराधार योजना समिती, लातूर यांचे महानगरपालिका अंतर्गत प्रभाग क्र.०४ मधील पत्रातील नमूद प्रस्तावित १३ विकास कामे जिल्हा वार्षिक योजनेमधून मंजूर करणे बाबत मा.मंत्री महोदयांकडे विनंती केली असून सदरील निवेदनातील खालील १३ कामांबाबत योग्य ती कार्यवाही करावी असे मा.मंत्री महोदयांनी निर्देश दिलेले आहेत असे पत्रामध्ये नमूद केले आहे. त्याअनुषंगाने सन २०२१-२०२२ जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण योजनेअंतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेस योजनेच्या अनुषंग निधीच्या मर्यादेत कामांचे अंदाजपत्रके, तांत्रिक मान्यता, सर्वसाधारण सभेचा ठराव व इतर कागदपत्रासह परिपूर्ण प्रस्ताव सादर करावा अशी विनंती केली आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	रक्कम (रु.लक्ष मध्ये)
१	बादाडे नगर कॉर्नर विठ्ठल रुक्मीणी मंदिर ते रिंगरोड पर्यंत सिमेंट रस्ता करणे	१०.००
२	बादाडे नगर येथील पोतदार यांच्या घरासमोरील दोन्ही बाजूची नाली बांधकाम करणे	०५.००
३	बादाडे नगर येथील रिंगरोड रस्ता, टॉवर लाईन रस्ता, घुमाळ किराणा ते रिंगरोड रस्ता,संजयनगर कमान ते रिंगरोड पर्यंत रस्ता व भवरीसिंग यांच्या घरापासून काझी यांच्या शेतापर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजूस सुशोभिकरण करणे	१०.००
४	तावरजा रेस्ट हाऊस जवळ विंधन विहीर घेणे व टाकीपर्यंत पाईपलाईन करणे	०७.००
५	बादाडे नगर कॉर्नर ते महमदभाई हॉटेलकडे जाणा-या रस्त्याच्या उजव्या बाजूचे चार गल्यामध्ये सिमेंट रोड करणे	१०.००
६	बादाडे नगर कॉर्नर ते टॉवरलाईन रस्त्याच्या उजव्या बाजूचे बीअरचे टाकीपर्यंत सिमेंट रोड करणे	०७.००
७	फारुकभाई पान दुकान ते अजहर बागवान किराणा दुकानापर्यंत सिमेंट रस्ता करणे	०८.००
८	रोशन उर्दू शाळेजवळ विंधन विहीर पाडणे व टाकीपर्यंत पाईपलाईन करणे	०७.००
९	संजयनगर समाज मंदिर पाठीमागे विंधन विहीर पाडणे व टाकीपर्यंत पाईपलाईन करणे	०६.००
१०	इस्लामपुरा भागातील डाव्या बाजूचे गल्ली नं.१,२,३,५,८,९ व १० येथे सिमेंट रस्ता करणे	१५.००
११	तख्खागत चौक ते सुफिया मस्जिद ते मदनी चौक ते संजयनगर कमानपर्यंत दोन्ही बाजूस सुशोभीकरण व ८ फुटी झाडे लावणे	०५.००
१२	हसन पठाण यांचे घरापासून रिंगरोड पर्यंत सिमेंट रस्ता करणे	०६.००
१३	आजम चौक ते मदनी चौकापर्यंत दोन्ही बाजूस सुशोभीकरण व ८ फुटी झाडे लावणे	०४.००

Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner

जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत सन २०२१-२०२२ साठी खालील प्रमाणे मंजूर नियतव्यय आहे.

अ.क्र.	योजनेचे नाव	मंजूर नियतव्यय	Spill on	शिल्लक
१	नागरी दलितेत्तर योजना	७,७३,०८,६५३.००	१,०७,२४,३५०.००	६,६५,८४,३०३.००
२	म.सु.नगरोत्थान (जिल्हास्तर)	८,२१,३९,००८.००	--	८,२१,३९,००८.००

तथापि मनपा सर्वसाधारण सभा दि.१२/१०/२०२१ ठराव क्र.२१० अन्वये नागरी दलितेत्तर योजना अंतर्गत रु.१०.१६ कोटीची एकूण ९१ कामे प्रस्तावित करण्यात आली आहेत. महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान(जिल्हास्तर) योजने अंतर्गत रु.१४.४२ कोटीची (मनपा हिस्यासह) १७५ कामे प्रस्तावित करण्यात आली आहेत. वरील १३ कामांची एकूण किंमत रु.०१.०० कोटी आहे.

सदरची कामे कोणत्या योजनेतून प्रस्तावित करावीत याबाबत निर्णय घेणेसाठी सादर.

<u>निर्णय:</u> उपरोक्त १३ कामे जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत सन २०२१-२०२२ महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान(जिल्हास्तर) योजने अंतर्गत प्राप्त होणा-या निधीमधून घेण्यास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येते.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

Scanned with OKEN Scanner

लातूर शहर महानगरपालिका,लातूर

प्रशासकीय विषय क्रं. २१. ठराव क्रं. ३७. दिनांक -२०/०९/2022

प्रस्ताव-

लातूर शहर महानगरपालिका हददीमध्ये जाहिरातीकरीता लातूर महानगरपालिका जाहिरात धोरणास मान्यता देणे व Unipole करीता जागा निश्चित करण्यास व सदर जागेचे ई-लिलाव करण्यास मान्यता देणे बाबत.

लातूर शहर महानगरपालिका मालकीच्या जागेमध्ये जाहिरात प्रदिर्शत करण्याकरीता विविध एजन्सीमार्फत Unipole उभारणेकरीता अर्ज आलेले आहेत. परंतू Unipole उभारणे बाबत जाहिरात धोरण निश्चित करणे व सदर पोल उभारणेच्या जागेची निवड करणे आवश्यक आहे. नगरविकास विभागाकडील दि. 09 मे 2022 रोजीच्या राजपत्रातील जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन व नियंत्रण करणारे नियम अधिसूचनेनुसार सदर जाहिरात धोरण तयार करण्यात आले असून सदर धोरणास मान्यता देणे आवश्यक आहे. तसेच Unipole उभारणेकरीता निश्चित केलेल्या जागांना मान्यता देणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे विषयांकित प्रकरणा बाबत विषय मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्यापुढे निर्णयास्तव सविनय सादर.

ठराव :-

वरील सादर झालेल्या प्रस्तावानुसार लातूर शहर महानगरपालिका, लातूर यांचे जाहिरात प्रदर्शना बाबतचे जाहिरात धोरणास मान्यता देण्यात येत आहे.

तसेच Unipole करीता जाहिरात धोरणानुसार जागा निश्चित करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर जागा निश्चित मा. आयुक्त, मा. उपायुक्त (मालमत्ता) व विभाग प्रमुख यांच्याकडून वेळोवेळी निश्चित करण्यात येतील यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर जागेचा ई-लिलाव करण्याकरीता मान्यता देण्यात येते.

नगर सचिव
लातुर शहर महानगरपालिका, लातुर

आयुक्त
लातुर शहर महानगरपालिका, लातुर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका लातूर

ठराव क्रमांकः- २३ दिनांक २१.07.2022

प्रस्तावः-

विषयः-लातूर शहर महानगरपालिका शाळा क्र.9 मधील तीन कंत्राटी शिक्षकांना मुदतवाढ देणेबाबत

लातूर शहर महानगरपालिका शाळा क्रमांक 9 मधील इयत्ता 9 वी 10 वीच्या वर्गासाठी कंत्राटी स्वरुपात नियुक्त असलेले सहशिक्षक 1. श्री. दिवे विलास माधवराव 2. श्रीमती पठाण जबीन अब्दुल रहेमान 3. श्रीमती जवळगेकर ज्योती बालाजी यांना शैक्षणीक वर्ष सन 2021-22 साठी स्थायी समिती सभा दि. 18/06/2021 विषय क्र.(03) ठराव क्र.187 अन्वये दिनांक 30.04.2022 पर्यंत मुदतवाढ देण्यास मंजुरी देण्यात आली होती. तरी उक्त तीन कंत्राटी सहशिक्षकांना शैक्षणिक वर्ष 2022-23 साठी मूदतवाढ देणे आवश्यक आहे.

तरी शैक्षणीक वर्ष 2022-23 साठी उक्त कंत्राटी शिक्षकांना दि. 2 जुन 2022 ते 30 एप्रिल 2023 पर्यंत मुदतवाढ देण्याबाबत निर्णय घेणेसाठी प्रस्ताव सादर.

निर्णयः-

	1.01) 1) Sattelite image procurement & drone survey 2) Differential GPS Survey 3) Electronic Total Station survey 4) Revenue Map Superimposition & Preparation of base map for the limits of Nagar Panchayt 5) Sanctioned Layout superimposition 6) Survey as per GR published date 25/01/2019 & date 17/06/2019 for preparation of existing Land use Map 7) Assistance to Town Planning Department in preparation of proposed Landuse Map and Development Plan (u/s 26 to 31 of M.R.T.P. act)	Rs. 10500 / Hectors
	1.02) Government / Municipal Land Survey with Electronic Total Station Survey	Rs. 27500 / Hectors
	1.03) Road Survey with Electronic Total Station Survey	Rs. 45000 / R.K.M.
	1.04) Government / Municipal Land Survey & Land Plan certification	Rs. 95000 / Unit

Scanned with OKEN Scanner

3	संयुक्त उपक्रम (Joint Venture) मुख्य – झेनोलीथ जिओ सर्व्हीसेस सहयोगी – अपेक्स कन्सल्टंट	
	1.01) 1) Sattelite image procurement & drone survey 2) Differential GPS Survey 3) Electronic Total Station survey 4) Revenue Map Superimposition & Preparation of base map for the limits of Nagar Panchayt 5) Sanctioned Layout superimposition 6) Survey as per GR published date 25/01/2019 & date 17/06/2019 for preparation of existing Land use Map 7) Assistance to Town Planning Department in preparation of proposed Landuse Map and Development Plan (u/s 26 to 31 of M.R.T.P. act)	Rs. 8924 / Hectors
	1.02) Government / Municipal Land Survey with Electronic Total Station Survey	Rs. 20000 / Hectors
	1.03) Road Survey with Electronic Total Station Survey	Rs. 39900 / R.K.M.
	1.04) Government / Municipal Land Survey & Land Plan certification	Rs. 40000 / Unit

सदर कामासाठी न्युनतम L1 निविदाधारक संयुक्त उपक्रम (Joint Venture) मुख्य – झेनोलीथ जिओ सर्व्हीसेस सहयोगी – अपेक्स कन्सल्टंट यांचे दर कमीचे आहेत तथापि सदरचे दर जास्त असल्याने वाटाघाटीने दर कमी करणेसाठी मा. आयुक्त यांचे दालनात दि. 09/02/2023 रोजी दर वाटाघाटीसाठी उपस्थित रहाणेबाबत पत्र क्र. 726 दि. 08/02/2023 अन्वये संयुक्त उपक्रम (Joint Venture) मधील मुख्य – झेनोलीथ जिओ सर्व्हीसेस यांना सुचना देण्यात आली. त्यानुसार दि. 09/02/2023 रोजी झेनोलीथ जिओ सर्व्हीसेस यांनी मा. आयुक्त यांचेसमवेत वाटाघाटीअंती दर कमी करण्याचे मान्य करुन वाटाघाटीअंती निश्चित केलेले दर त्यांचे पत्र XENO/LMC/DP/01/2023 दि. 09/02/2023 अन्वये सादर केले ते खालीलप्रमाणे आहेत.

अ.क्र.	एजन्सीचे नाव	वाटाघाटीअंती दिलेले सुधारीत दर
3	संयुक्त उपक्रम (Joint Venture) मुख्य – झेनोलीथ जिओ सर्व्हीसेस सहयोगी – अपेक्स कन्सल्टंट	
	1.01) 1) Sattelite image procurement & drone survey 2) Differential GPS Survey 3) Electronic Total Station survey 4) Revenue Map Superimposition & Preparation of base map for the limits of Nagar Panchayt 5) Sanctioned Layout superimposition 6) Survey as per GR published date 25/01/2019 & date 17/06/2019 for preparation of existing Land use Map 7) Assistance to Town Planning Department in preparation of proposed Landuse Map and Development Plan (u/s 26 to 31 of M.R.T.P. act)	**Rs. 8280 / Hectors**
	1.02) Government / Municipal Land Survey with Electronic Total Station Survey	**Rs. 19500 / Hectors**
	1.03) Road Survey with Electronic Total Station Survey	**Rs. 38500 / R.K.M.**
	1.04) Government / Municipal Land Survey & Land Plan certification	**Rs. 35000 / Unit**

तरी संयुक्त उपक्रम (Joint Venture) मुख्य – झेनोलीथ जिओ सर्व्हीसेस सहयोगी – अपेक्स कन्सल्टंट यांनी वाटाघाटीअंती सादर केलेल्या सुधारीत दरानुसारची ई-निविदा मंजूर करणेसाठी निर्णयास्तव सादर.

निर्णय :-

लातूर महानगरपालिका हद्दीचा महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २५ अन्वये विद्यमान जमीन वापर नकाशा शासन निर्णय क्र. टिपीएस-१८१८/१४८९/प्र.क्र.३०३/१८/नवि-१३ दि. २५/०१/२०१९ व दि. १७/०६/२०१९ रोजीच्या शुद्धीपत्रकातील निर्देशानुसरार भौगोलीक माहिती प्रणालीद्वारे (GIS) तयार करणे तसेच विकास योजना तयार करण्यासाठी नगर रचना अधिकारी, विकास योजना लातूर म.न.पा. यांना सहकार्य करणे आणि महानगरपालिका हद्दीतील शासकीय / महानगरपालिकेच्या जागांचे, मंजुर रस्त्यांचे टोटल स्टेशन मशिन / ड्रोनद्वारे सर्व्हेक्षण करुन नकाशे तयार करणे, दस्त तयार करणे व भुमी अभिलेख / नगर भुमापन विभागाकडून प्रमाणीत करुन अतिक्रमणीत क्षेत्राची हद्द निश्चिती करणे या कामासाठी ई-निविदा क्र. 01/2022-23 Tende ID 2022_LMC_858186_1 अन्वये मागविण्यात आलेल्या निविदा करीता L1 निविदाधारक संयुक्त उपक्रम (Joint Venture)

Scanned with OKEN Scanner

मुख्य – झेनोलीथ जिओ सर्व्हीसेस सहयोगी – अपेक्स कन्सल्टंट यांनी त्यांचे पत्र XENO/LMC/DP/01/2023 दि. 09/02/2023 अन्वये वाटाघाटीअंती सादर केलेल्या खालीलप्रमाणेचे सुधारीत दरास व ई-निविदेस याद्वारे मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

अ.क्र.	एजन्सीचे नाव	वाटाघाटीअंती दिलेले सुधारीत दर
3	संयुक्त उपक्रम (Joint Venture) मुख्य – झेनोलीथ जिओ सर्व्हीसेस सहयोगी – अपेक्स कन्सल्टंट	
	1.01) 1) Sattelite Image procurement & drone survey 2) Differential GPS Survey 3) Electronic Total Station survey 4) Revenue Map Superimposition & Preparation of base map for the limits of Nagar Panchayt 5) Sanctioned Layout superimposition 6) Survey as per GR published date 25/01/2019 & date 17/06/2019 for preparation of existing Land use Map 7) Assistance to Town Planning Department in preparation of proposed Landuse Map and Development Plan (u/s 26 to 31 of M.R.T.P. act)	**Rs. 8280 / Hectors**
	1.02) Government / Municipal Land Survey with Electronic Total Station Survey	**Rs. 19500 / Hectors**
	1.03) Road Survey with Electronic Total Station Survey	**Rs. 38500 / R.K.M.**
	1.04) Government / Municipal Land Survey & Land Plan certification	**Rs. 35000 / Unit**

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

आयुक्त,
लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

Scanned with OKEN Scanner

लातूर शहर महानगरपालिका, लातूर
मोटार वाहन विभाग

मा. प्रशासकीय ठराव विषय क्र. 72 ठराव क्र. 72 दि.17/02/2023

विषय - लातूर शहर महानगरपालिका अधिकारी / विभाग प्रमुख यांना भाडे तत्वावर टुरिस्ट परमिटची वाहने पुरवठा करणे बाबत.

प्रस्ताव -

लातूर शहर महानगरपालिकेच्या अधिकारी / विभाग प्रमुखांना यांना भाडे तत्वावर टुरीस्ट परमिटची वाहने पुरवठा करणेसाठी निविदा सु.क्र.02/2022-23 दि.27/09/2022 रोजी मागविण्यात आले होते.निविदाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

निविदा सुचना क्र.02/2022-23
निविदा आयडी.क्र.LMC_838556_1
प्रथमवेळ निविदा मागवलेला दि. 27/09/2022 ते 11/09/2022
प्रथमवेळ मुदत वाढ दि.18/10/2022
दुसरी वेळ मुदत वाढ दि.27/10/2022

भाडयाने वाहने पुरवठा करणेसाठी निविदा सु.क्र.02/2022-23 दि.27/09/2022 रोजी मागविण्यात आले होते. मुदतीत एकही निविदा प्राप्त झाले नाही. त्यामुळे निविदास प्रथमवेळ मदुतवाढ देण्यात आली त्यामध्ये दोनच निविदा प्राप्त झालेचे निर्दशनास आले. कमाल निवीदा प्राप्त न झाल्याने सदर निवीदास दुस-यावेळी मदुतवाढ देण्यात आले.दुस-यावेळी सुध्दा दोनच निवीदा प्राप्त झाले होते.मनपाचे अधिकारी यांना दैनंदीन कामाची निकड लक्षात घेता दुस-या मुदतवाढी दरम्यान प्राप्त झालेले दोन निविदाचा प्राधिकृत अधिकारी यांचे मान्यतेने तांञिक लिफाफा उघडण्यात आला. निविदा समितीने निविदा कागदपञाची छाननी केली असता दोन पैकी ईश्वरी टुर्स ॲन्ड ट्रॅव्हल्स यांची निवीदा अपाञ ठरवली व तोंडारे टुर्स ॲन्ड ट्रॅव्हर्ल्स यांची निविदा पाञ ठरवण्यात आली.

तोंडारे टुर्स ॲन्ड ट्रॅव्हल्स यांची निविदा पाञ झाल्याने त्यांचे निविदाचा आर्थिक लिफाफा उघडण्यात आला. त्यांनी सादर केलेले दर खालील तक्तयात दर्शविण्यात येत आहेत.

अ.क्र	वाहनाचा प्रकार	नग संख्या	प्रति दिवस भाडे (रूपये)	प्रति की.मी.भाडे (रूपये)
1	टाटा इंडिका / इंडिगो	1	510/-	8.00
2	टाटा सुमो / बोलेरो	1	1000/-	8.00
3	क्रुझर	1	800/-	8.00
4	इनोव्हा	1	1000/-	11.80
5	स्वीफ्ट डिझायर / इरटीगा	1	935/-	11.00
6	टवेरा / स्कारपीओ	1	800/-	8.00

Scanned with OKEN Scanner

वरील प्रमाणे तोंटारे टुर्स अॅन्ड ट्रॅव्हल्स यांचे भाडयाचे दर प्राप्त झाले आहेत. तरी प्राप्त झालेले दराचा विषय मान्यतेस्तव व निर्णयास्तव सादर.

निर्णय -

लातूर शहर महानगरपालिकेच्या अधिकारी / विभाग प्रमुख यांना भाडयाने वाहने पुरवठा करणेसाठी तोंडारे टुर्स अॅन्ड ट्रॅव्हल्स यांचे प्राप्त झालेल्या भाडयाचे दरास प्रशासकीय मान्यता देण्यात येते.

नगरसचिव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका लातूर

ठराव क्रमांकः- 73 दिनांक 20/02/ 2023

विषयः- महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधांचा विकास योजना अंतर्गतच्या कामाबाबत.

संदर्भः- १) मा.जिल्हाधिकारी, लातूर यांचे प्र.मा.आदेश क्र.२०२२/नपाप्र/मुलभूत सोयी सविधा/कावि- दि.१०.०३.२०२२
२) महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचे शासन शुध्दीपत्रक क्र.मनपा-२०१८/प्र.क्र.१७०-अ(२२)/नवि-१६ दिनांक-०९ नोव्हेंबर, २०२२
३) सहाय्यक अभियंता श्रेणी-१, सा.बां.उपविभाग क्र.१, लातूर यांचे पत्र क्र.तांशा/१६४३ दि.१८.११.२०२२
४) या कार्यालयाचे पत्र क्र.लामनपा/बांध./७११५/२०२२-२३ दि.२२.११.२०२२
५) जिल्हा सह आयुक्त, न.प.प्र.शाखा, जि.का.लातूर यांचे पत्र क्र.२०२३/नपाप्र/कावि-१३९० दि.२३.०१.२०२३
६) कार्यकारी अभियंता, सार्व.बांधकाम विभाग, लातूर यांचे पत्र क्र. प्रशा-३/५५८ दि.१४.०२.२०२३

प्रस्तावना-

महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधांचा विकास योजना अंतर्गतच्या खालील कामांना मा.जिल्हाधिकारी, लातूर यांनी संदर्भ क्र.०१ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केले आहेत. तसेच सदर कामांची कार्यान्वयण यंत्रणा सार्वजनिक बांधकाम विभाग राहील असे कळविले आहेत.

अ.क्र.	कामाचे नांव	प्र.मा.रक्कम
१.	प्र.क्र.१३ श्री पटेल यांच्या घरापासून श्री बापू सोनवणे यांच्या घरापर्यंत दोन्ही बाजू रस्ते कॉक्रीटीकरण करणे.	६९,९८,०२९.००
२.	प्र.क्र.१३ महेंद्र गॅरेज ते पी.डी.चव्हाण यांच्या घरापर्यंत दोन्ही बाजू रस्ते कॉक्रीटीकरण करणे.	२९,९६,२५४.००
३.	प्र.क्र.१३ सावंत किराणा ते चलमले यांच्या परिसरातील रस्ते कॉक्रीटीकरण करणे.	२९,९७,२१८.००
४.	प्र.क्र.१३ रस्ते कॉक्रीटीकरण करणे.	१९,७८,६३५.००
५.	प्र.क्र.१२ रस्ते कॉक्रीटीकरण करणे.	१९,७८,६३५.००
६.	प्र.क्र.०३ तुळाजाभवानी नगर येथे (भोई वाडा) रस्ते कॉक्रीटीकरण करणे.	१९,९९,११२.००
७.	प्र.क्र.०३ राजीव नगर येथे रस्ता कॉक्रीटीकरण करणे.	९,८९,२४२.००
८.	प्र.क्र.१७ मलंग सीटी बाजूस कॉक्रीटीकरण करणे.	९,८९,२४२.००
९.	प्र.क्र.१७ मलंगसीटी बाजूस गटार करणे.	९,८२,०५३.००
१०.	प्र.क्र.१० पैके हॉस्पिटल शेजारी रस्ता कॉक्रीटीकरण करणे.	१९,९९,६५६.००
११.	प्र.क्र.६/१६ रस्ता कॉक्रीटीकरण करणे.	१९,९६,३३६.००
१२.	प्र.क्र.१५ रस्ता कॉक्रीटीकरण करणे.	१९,९५,१८०.००
१३.	प्र.क्र.१७ बलदवा नगर अंतर्गत कॉक्रीटीकरण करणे.	९,९१,७३७.००
१४.	प्र.क्र.१७ एल.आय.सी.कॉलनी येथे कॉक्रीटीकरण करणे.	९,९९,५००.००
	एकुण रुपये-	२,९८,९०,८२९.००

तथापि संदर्भ क्र.०२ चे शासन शुध्दीपत्रक अन्वये मुलभूत सोयी सुविधांचा विकास या योजनेंतर्गत विविध विकास कामांकरिता अनुदान देण्यांत येते. संदर्भाधीन क्र. (२) येथील अ.क्र.१,२,३,४,५,६,१०,११,१२ (रक्कम रु.२५०.०० लक्ष) येथील कामांस कार्यारंभ आदेश दिल्या नसल्यास सदर कामे रद्द करुन सोबत जोडलेल्या विवरणपत्रातील कामांस मान्यता देण्यांत येत आहे कळविले आहे. विवरणपत्रातील कामे खालील प्रमाणे आहेत.

Scanned with OKEN Scanner

अ.क्र.	कामाचे नांव	रक्कम
१.	कातपूर रोड येथील १५५ जमीन सर्व्हे नं. मधील नाली बांधकाम करणे.	५०.०० लक्ष
२.	पद्मिनी डायनॅमीक सिटी येथील अंतर्गत रोड व गटार बांधकाम करणे.	१००.०० लक्ष
३.	राघवेंद्र कॉलनी प्रभाग क्र.१७ मध्ये अंतर्गत रस्ते व नाली करणे.	४०.०० लक्ष
४.	कन्हैया नगरी जमीन सर्व्हे नं.९१/ब मधील अंतर्गत रस्ते व गटारी करणे.	६०.०० लक्ष
	एकुण रुपये-	२५०.०० लक्ष

संदर्भ क्र.०३ च्या पत्रान्वये सहाय्यक अभियंता श्रेणी-१, सा.बां.उपविभाग क्र.१, लातूर यांनी उक्त ०४ कामांसाठी नाहरकत प्रमाणपत्र मिळणेची विनंती केले वरुन संदर्भ क्र.०४ अन्वये शहर अभियंता व नगर रचनाकार यांचे स्वाक्षरीने ०४ कामांसाठीचे विविध प्रमाणपत्र देण्यांत आले होते. तथापि, संदर्भ क्र.०५ अन्वये जिल्हा सह आयुक्त, न.प.प्र.शाखा, जि.का.लातूर यांनी कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, लातूर यांनी उक्त ०४ कामास प्रशासकीय मान्यता मिळणेसाठी सादर केलेल्या प्रस्तावामध्ये लातूर शहर महानगरपालिकेचा ठराव जोडण्यांत आला नाही, सादर करण्यांत आलेले प्रमाणपत्र हे मा.आयुक्त यांचे स्वाक्षरीने सादर करणे आवश्यक आहे अशा त्रुटी काढून त्याची एक प्रत या कार्यालयास माहितीस्तव देण्यांत आली आहे. तसेच संदर्भ क्र.०६ अन्वये कार्यकारी अभियंता, सार्व.बांधकाम विभाग, लातूर यांनी मा.जिल्हाधिकारी, लातूर यांनी संदर्भ क्र.०१ अन्वये दिलेल्या प्रशासकीय मान्यतेमधील अ.क्र.७,८,९,१३ व १४ या ०५ कामांचे कार्यारंभ आदेश दिलेले असून अ.क्र.१,२,३,४,५,६,१०,११ व १२ या ०९ कामांचे कार्यारंभ आदेश दिले नसल्याचे कळविले आहे.

उपरोक्त नुसार प्रस्ताव निर्णय घेणेसाठी सविनय सादर.

निर्णयः-

उपरोक्त सादर केलेल्या प्रस्तावानुसार मा.जिल्हाधिकारी, लातूर यांनी संदर्भ क्र.०१ अन्वये दिलेल्या प्रशासकीय मान्यतेमधील व संदर्भ क्र.०६ अन्वये कार्यकारी अभियंता, सार्व. बांधकाम विभाग, लातूर यांनी कळविलेनुसार प्रशासकीय मान्यतेमधील अ.क्र.१,२,३,४,५,६,१०,११ व १२ या ०९ कामांचे कार्यारंभ आदेश न दिलेने संदर्भ क्र.०२ च्या शासन शुध्दीपत्रक विवरणपत्रातील खालील कामांस मान्यता देण्यांत येत आहे. त्यानुसार कार्यकारी अभियंता, सार्व.बांधकाम विभाग, लातूर यांनी शासन निर्णयातील सर्व अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन करावे.

अ.क्र.	कामाचे नांव	रक्कम
१.	कातपूर रोड येथील १५५ जमीन सर्व्हे नं. मधील नाली बांधकाम करणे.	५०.०० लक्ष
२.	पद्मिनी डायनॅमीक सिटी येथील अंतर्गत रोड व गटार बांधकाम करणे.	१००.०० लक्ष
३.	राघवेंद्र कॉलनी प्रभाग क्र.१७ मध्ये अंतर्गत रस्ते व नाली करणे.	४०.०० लक्ष
४.	कन्हैया नगरी जमीन सर्व्हे नं.९१/ब मधील अंतर्गत रस्ते व गटारी करणे.	६०.०० लक्ष
	एकुण रुपये-	२५०.०० लक्ष

नगर सचिव,
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

प्रशासक,
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

ठराव क्र. 74 दिनांक 20/02/२०२३

विषय :- ई-निविदा क्र. ४२/२०२२-२३ अन्वये मागविण्यात आलेल्या निविदावर विचार विनिमय करून निर्णय घेणे बाबत.

मुलभुत सोयी सुविधा योजना अंतर्गत Proposed construction of R.C.C. Drain at SamratChowk in P.No. 3 for M.C. Latur & Proposed Development of R.C.C. Drain from Market Committee Shoping Complex to SamratChowk for M.C. Latur & Proposed construction of B.S. Drain at ansar Nagar Chand Bagwan-RafikTailer to ShohelShaikh, Proposed construction of Drain at Different Locations Hatte Nagar & Sale Galli & Proposed development of R.C.C. Drain & C D Work at Gul Market for M.C. Latur. या कामासाठी ई-निविदा क्र. 42/2022-23 अन्वये निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर ई-निविदेची किंमत रु. 62,73,373/- आहे. त्यानुसार सदर कामासाठी खालील ०7 (सात) निविदाधारक सहभागी झाले होते.

1) टेकइंफ्रा इंजिनिअरींग प्रा.लि.
2) जयप्रकाश जगन्नाथ माने, लातूर.
3) शाहेद सत्तार मणीयार, लातूर.
4) ए.आर. कन्स्ट्रक्शन, लातूर.
5) अनंत कन्स्ट्रक्शन, लातूर.
6) सागर प्रताप बिराजदार, लातूर.
7) अनिल भिमाशंकर हासबे

वरील एजन्सीधारकांचा लिफाफा क्र. 1 (Technical Bid) दि. 02/11/2022 रोजी उघडण्यात आला. कागदपत्रांची तांत्रिक तपासणी करून सर्व निविदाधारक यांनी निविदेतील अटी व शर्तीनुसार कागदपत्रे सादर केलेली असल्याने त्यांना पात्र करण्यात आले.

त्याअनुषंगाने निविदेचा पात्र निविदाधारकांचा लिफाफा क्र. 02 (दरकारपत्रक) दि. 10/11/2022 रोजी उघडण्यात आला. निविदाधारक यांनी सदर कामासाठी खालीलप्रमाणे दर दिले आहेत.

अ.क्र.	एजन्सीचे नाव	दिलेले दर
1	टेकइंफ्रा इंजिनिअरींग प्रा.लि.	अंदाजपत्रक दरापेक्षा 1.00% अधिक
2	जयप्रकाश जगन्नाथ माने, लातूर.	अंदाजपत्रक दरापेक्षा 0.999% कमी
3	शाहेद सत्तार मणीयार, लातूर.	अंदाजपत्रक दरापेक्षा 1.50% अधिक
4	ए.आर. कन्स्ट्रक्शन, लातूर.	अंदाजपत्रक दरापेक्षा 12.00% कमी
5	अनंत कन्स्ट्रक्शन, लातूर.	अंदाजपत्रक दर
6	सागर प्रताप बिराजदार, लातूर.	अंदाजपत्रक दरापेक्षा 2.870% अधिक
7	अनिल भिमाशंकर हासबे	अंदाजपत्रक दरापेक्षा 9.560% कमी

सदर कामासाठी न्युनतम 1.1 निविदाधारक ए.आर.कन्स्ट्रक्शन, लातूर यांची अंदाजपत्रक दरापेक्षा 12.00% कमी या दराची निविदा मंजूर करणेसाठी निर्णयास्तव सादर.

Scanned with OKEN Scanner

र्णय :- Proposed construction of R.C.C. Drain at SamratChowk in P.No. 3 for M.C. Latur & Proposed Development of R.C.C. Drain from Market Committee Shoping Complex to SamratChowk for M.C. Latur & Proposed construction of B.S. Drain at ansar Nagar Chand Bagwan-RafikTailer to ShohelShaikh, Proposed construction of Drain at Different Locations Hatte Nagar & Sale Galli & Proposed development of R.C.C. Drain & C D Work at Gul Market for M.C. Latur. या कामासाठी ई-निविदा क्र. 42/2022-23 अन्वये मागविण्यात आलेल्या निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा ए.आर. कन्स्ट्रक्शन, लातूर यांची अंदाजपत्रक दरापेक्षा 12.00% कमी दराची निविदा आहे. निविदाकार ए.आर. कन्स्ट्रक्शन, लातूर यांनी निविदेत दिलेल्या दरास मान्यता देण्यात येते.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

प्रशासक,
लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

ठराव क्र. 175 दिनांक 21/02/2023

विषय :- ई-निविदा क्र. 98/2021-22 अन्वये मागविण्यात आलेल्या निविदावर विचार विनिमय करुन निर्णय घेणे बाबत.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी अनुसुचित जाती व नवबौद्ध वस्ती सुधारणा योजना अंतर्गत Proposed construction of Lokshhir Annabhau Sate Sanskrutik Sabhagrah for M.C. Latur. या कामासाठी ई-निविदा क्र. 98/2021-22 अन्वये निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर ई-निविदेची किंमत रु. 59,07,736/- आहे. त्यानुसार सदर कामासाठी खालील 03 (तीन) निविदाधारक सहभागी झाले होते.

1) सादीक इलीयासखॉं पठाण, लातूर.
2) अंबिका कन्स्ट्रक्शन, लातूर.
3) सय्यद राशेद सरताज, उस्मानाबाद.

वरील एजन्सीधारकांचा लिफाफा क्र. 1 (Technical Bid) दि. 04/04/2022 रोजी उघडण्यात आला. कागदपत्रांची सांघिक तपासणी करुन सर्व निविदाधारक यांनी निविदेतील अटी व शर्तीनुसार कागदपत्रे सादर केलेली असल्याने त्यांना पात्र करण्यात आले.

त्याअनुषंगाने निविदेचा पात्र निविदाधारकांचा लिफाफा क्र. 02 (देकारपत्रक) दि. 04/05/2022 रोजी उघडण्यात आला. निविदाधारक यांनी सदर कामासाठी खालीलप्रमाणे दर दिले आहेत.

अ.क्र.	एजन्सीचे नाव	दिलेले दर
1	सादीक इलीयासखॉं पठाण, लातूर.	अंदाजपत्रक दरापेक्षा 25.00% अधिक
2	अंबिका कन्स्ट्रक्शन, लातूर.	अंदाजपत्रक दरापेक्षा 30.00% कमी
3	सय्यद राशेद सरताज, उस्मानाबाद.	अंदाजपत्रक दरापेक्षा 10.00% अधिक

सदर कामासाठी न्युनतम T.I निविदाधारक सय्यद राशेद सरताज, उस्मानाबाद यांची निविदा अंदाजपत्रक दरापेक्षा 10.00% अधिक या दराची असल्याने वाटाघाटीने दर कमी करणेबाबत या कार्यालयाचे पत्र क्र. 4145 दि. 24/06/2022 अन्वये कळविण्यात आले होते. त्यानुसार सय्यद राशेद सरताज यांनी त्यांचे पत्र दि. ०१/०७/२०२२ अन्वये दरपृथ्थकरण सादर करुन निविदेत सादर केलेले दर योग्य असून चालू दरसूची 2022-23 नुसार सदर दर अंदाजपत्रक दरापेक्षा 2.22% कमी असून दर मंजूर करण्याची विनंती केली आहे.

तरी सय्यद राशेद सरताज यांचे अंदाजपत्रक दरापेक्षा 10.00% अधिक चे दराची निविदा मंजूर करणेसाठी निर्णयास्तव सादर.

निर्णय :- लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी अनुसुचित जाती व नवबौद्ध वस्ती सुधारणा योजना अंतर्गत Proposed construction of Lokshhir Annabhau Sate Sanskrutik Sabhagrah for M.C. Latur. या कामासाठी ई-निविदा क्र. 98/2021-22 अन्वये मागविण्यात आलेल्या निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा सय्यद राशेद सरताज, उस्मानाबाद यांची अंदाजपत्रक दरापेक्षा 10.00% अधिक दराची निविदा आहे. निविदाकार सय्यद राशेद सरताज, उस्मानाबाद यांनी निविदेत दिलेल्या दरास मान्यता देण्यात येते.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

प्रशासक,
लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

Scanned with OKEN Scanner

लातूर शहर महानगरपालिका,लातूर

(शिक्षण विभाग)

विषय क्रं.५६ ठराव क्रं.५६

प्रस्ताव :-

लातूर शहर महानगरपालिका शिक्षण विभाग अंतर्गत सावित्रीबाई फुले म.न.पा. शाळा क्र.09 येथे कंत्राटी स्वरुपात कार्यरत तीन (०३) शिक्षकांच्या मानधनामध्ये वाढ करणे बाबत.

लातूर शहर महानगरपालिका शिक्षण विभाग अंतर्गत सावित्रीबाई फुले म.न.पा. शाळा क्र.09 येथे कंत्राटी स्वरुपात कार्यरत असलेले तीन (०३) शिक्षक श्री.दिवे विलास माधवराव, श्रीम.पठाण जबीन अब्दुलरहेमान व श्रीम.जवळगेकर ज्योती बालाजी यांनी त्यांचे मानधनामध्ये वाढ करणेबाबत दि.01.09.2022 अन्वये विनंती अर्ज केला आहे.

उक्त कंत्राटी स्वरुपात कार्यरत तीन शिक्षकांना प्रथम तीन वर्षासाठी शिक्षण सेवक म्हणून रु 8,000/- प्रतिमाह प्रमाणे मानधन देण्यात आले आहे. नंतरच्या कालावधीत स्थायी समिती विशेष सभा दि.25.01.2022 ठराव क्र.232 नुसार त्यांचे मानधनामध्ये रु 7,000/- ची वाढ करुन एकूण रु 15,000/- इतके मानधन देण्यात येत आहे. तथापी मानधन तत्वावर नियूक्त उक्त शिक्षकांनी त्यांना मिळणारे मानधन हे अपूरे असून त्यांनी प्रतिमाह रु 30,000/- इतके मानधन मिळण्याची विनंती केली आहे.

तरी लातूर शहर महानगरपालिका शिक्षण विभाग अंतर्गत सावित्रीबाई फुले म.न.प. शाळा क्र.09 येथे कंत्राटी स्वरुपात कार्यरत असलेले तीन (०३) शिक्षक श्री.दिवे विलास माधवराव, श्रीम.पठाण जबीन अब्दुलरहेमान व श्रीम.जवळगेकर ज्योती बालाजी यांचे माहे जून-2022 पासून मानधनामध्ये वाढ करणेबाबतचा प्रस्ताव सादर.

निर्णय/ठराव

उपरोक्त सादर प्रस्तावानुसार लातूर शहर महानगरपालिका शिक्षण विभाग अंतर्गत सावित्रीबाई फुले म.न.पा. शाळा क्र.09 येथील कंत्राटी स्वरुपात कार्यरत असलेले तीन (०३) शिक्षक श्री.दिवे विलास माधवराव, श्रीम.पठाण जबीन अब्दुलरहेमान व श्रीम.जवळगेकर ज्योती बालाजी यांचे मानधनामध्ये वाढ करणेबाबतच्या प्रस्तावानुसार उक्त शिक्षकांच्या सध्याच्या रु 15,000/- च्या मानधनामध्ये वाढ करुन त्यांना माहे-जुन-2022 पासून प्रतिमाह एकूण रु 25,000/- इतके मानधन देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

नगरसचिव

लातूर शहर महानगरपालिका,लातूर

आयुक्त तथा प्रशासक

लातूर शहर महानगरपालिका,लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

ठराव क्रं. 117 दि. 22/2/2023

विषय - आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील नागरिकांना कमी दरात नळ कनेक्शन देणे बाबत.

प्रस्ताव -

केंद्र शासनाच्या शाश्वत विकासाच्या ध्येयांमधील पाणी पुरवठ्याबाबत सर्व घरांना नळ जोडणी देऊन पाणी पुरवठ्याच्या बाबतीत शहरे 100 % स्वयंपुर्ण करणे बाबत ध्येय ठेवण्यात आले आहे. सदर ध्येयाचे उद्दिष्ठ गाठणेकरिता 100 % नळ जोडणी करण्यासाठी अर्थिक दुर्बल घटकातील नागरिकांना कमी दरात नळ जोडणीची मागणी होत आहे. जुने सिग्नल कॅम्प येथे काही वर्षापुर्वी झोपडपट्टी होती ती आता महानगरपालिकेने आर्वी गायरान येथे स्थलांतरीत केली असुन तिथे 300 च्या जवळपास परिवार हे अर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील असुन त्यांना महानगरपालिकेची नळ कनेक्शन जोडणीची फिस भणा करु शकत नाहीत. सदर भागातील रहिवाश्यांना नळ जोडणी द्यावयाची असल्यास अतिरीक्त चार्जेस कमी करुन फक्त डिमांड रक्कम रु. 1800/- भरणा करुन घेऊन नळ कनेक्शन देणे योग्य वाटते.

निर्णय :- लातूर मनपा अंतर्गत अर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील नागरिकांना त्यांच्या प्राप्त अर्जानुसार रक्कम रु.1800/- भरणा करुन नविन नळ कनेक्शन देण्याची कार्यवाही करणेस मान्यता देण्यात येते.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

Scanned with OKEN Scanner

लातूर शहर महानगरपालिका,लातूर

प्रधानमंत्री आवास योजना

प्रशासकीय विषय क्रमांक ---48------ ठराव क्रमांक --48--- दिनांक 22/02/2023

प्रस्ताव -

मा.उप-सचिव ,महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग मंत्रालय ,मुंबई यांचे पत्र दिनांक 20 जानेवारी 2023 नुसार प्रस्तावित Curtailment साठी DPR यादीसोबत महानगरपालिकेचा ठराव सोबत सादर करण्याबाबत आदेशीत करण्यात आले आहे.

लातूर शहर महानगरपालिका, हद्दीमध्ये प्रधानमंत्री आवास योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येत आहे. लातूर शहरामध्ये योजनेच्या BLC घटकामध्ये नविन प्रस्ताव मंजूर करण्यात आले आहेत. BLC घटकाच्या प्रथम DPR 1 मध्ये 422 लाभार्थ्यांपैकी 246 व व्दितीय DPR 2 मध्ये 488 लाभार्थ्यांपैकी 295 लाभार्थ्यांनी काम सुरू केले आहे. उर्वरित लाभार्थ्यांनी बांधकाम परवानगी घेऊन घरकुलाचे बांधकाम सुरू करणेकरीता वारंवार भमनध्वनी तसेच नोटीसव्दारे कळविण्यात आलेले होते. परंतू कांही लाभार्थ्यांनी त्यास कोणताही प्रतिसाद दिलेला नाही व कांही लाभार्थ्यांनी कांही कारणामुळे काम करण्यास असमर्थता दर्शविलेली आहे.त्यामुळे त्या लाभार्थीचे नावे Curtailment करून शासनास सुधारीत DPR सादर करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत. प्रथम DPR मध्ये 246 लाभार्थी व व्दितीय DPR मध्ये 295 लाभार्थ्यांनी काम सुरू केल्याने त्यांची नावे कायम ठेवून उर्वरित लाभार्थ्यांची नावे वगळून (Curtailment) DPR सादर करणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने DPR 1 व DPR 2 मधील एकूण 541 लाभार्थ्यांचा सुधारीत सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) मा.प्रशासक यांच्यापुढे निर्णयास्तव सविनय सादर.

<u>प्रशासकीय निर्णय</u> - वरील सादर झालेल्या प्रस्तावानुसार लातूर शहर महानगरपालिका, प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत, मा.उप-सचिव ,महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग मंत्रालय ,मुंबई यांचे पत्र दिनांक 20 जानेवारी 2023 नुसार प्रस्तावित Curtailment साठी DPR 1 मधील 246 व DPR 2 मधील 295 लाभार्थ्यांचे सुधारीत सविस्तर प्रकल्प अहवालास (DPR) मंजूरी देण्यात येते.

नगर सचिव,
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

प्रशासक,
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

Scanned with OKEN Scanner

लातूर शहर महानगरपालिका,लातूर

प्रशासकीय ठराव क्रं. 79.. दिनांक -22/02/2023

प्रस्ताव-

महानगरपालिका हददीमध्ये मनपा मालकीच्या जागेवर उभ्याने माल विकण्याची जागे बाबत भाडे आणि फी आकारणी करणे बाबत विचारविनिमय करुन निर्णय घेणे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 332 (अ) (ब) (क) अन्वये महानगरपालिका बाजार, कत्तलखाने आणि पशू-आवारे यांवर दुकान-भाडे, भाडे आणि फी आकारणी करणे बाबत तरतूद आहे. त्याप्रमाणे लातूर शहर महानगरपालिकाचे उत्पन्न वाढविणे करीता लातूर शहर महानगरपालिका हददीतील व्यवसायीकांना दैनंदिन बाजार फि आकारणी करणे योग्य राहील. लातूर शहर महानगरपालिकातील एनयुएलएम विभागाने फेरीवाले यांची दिलेल्या यादीमध्ये एकूण 2976 फेरीवाल्यांची अधिकृत नोंद आहे. लातूर शहर महानगरपालिका हददीमध्ये या यादी व्यतिरिक्त अनेक फेरीवाले आहेत. लातूर शहर महानगरपालिका मधील स्वच्छता निरिक्षक यांनी केलेल्या सर्वेमध्ये 1998 फेरीवाले / तात्पुरत्या स्वरुपात व्यावसाय करणारे, आढळून आलेले आहेत. असे नोंदणीकृत 2976 व सर्वे मधे आढळलेले 1998 असे एकूण 4974 तात्पुरते व्यावसायीक होतात. सदर तात्पुरते व्यावसायीक यांना प्रति दिवस 10/- रु प्रमाणे बाजार परवाना फीसची आकारणी केल्यानंतर खालीलप्रमाणे उत्पन्न महानगरपालिकेस प्राप्त होणार आहे.

- 4974 व्यावसायिक * प्रति दिवस बाजार फी 10/- रु = 49740/- रु प्रति दिवस
- 49740/- प्रति दिवस * 30 दिवस = 1492200/- प्रति महा
- 1492200/- प्रति महा * 12 प्रति वर्ष = 17906400/- प्रति वर्ष

तरी वरीलप्रमाणे जाहिरात दर निश्चित करण्यात आल्यास लातूर शहर महानगरपालिकेच्या आर्थिक उत्पन्नात वाढ होणार आहे.

निर्णय :-

उपरोक्त प्रस्तावानुसार महानगरपालिका हददीमध्ये मनपा मालकीच्या जागेवर उभ्याने माल विकण्याची बाजार परवाना फीस आकारणी करणेसाठी प्रस्तावीत करण्यात आलेल्या दरास मान्यता देण्यात येत आहे.

नगर सचिव
लातुर शहर महानगरपालिका, लातुर

आयुक्त
लातुर शहर महानगरपालिका, लातुर

Scanned with OKEN Scanner

लातूर शहर महानगरपालिका,लातूर

प्रशासकीय ठराव क्रं. 80. दिनांक - 22/02/2023

प्रस्ताव-

महानगरपालिका हददीमध्ये मनपा मालकीच्या जागेवर, खाजगी जागेवर / इमारतीवर कायम स्वरूपी व तात्पुरत्या लावण्यात येणा-या जाहिराती / होर्डींग्ज जाहिरात कर दरामध्ये वाढ करणे बाबत विचारविनिमय करुन निर्णय घेणे.

लातूर शहर महानगरपालिका लातूर सर्वसाधारण सभा दिनांक - 20/09/2012 ठराव क्रं. 17 अन्वये मनपा व शासकीय जागेवर 50/- रु प्रति चौ.मी. व खाजगी जागेवर 15/- रु प्रति चौ.मी. असे दर निश्चित करण्यात आले होते. मा. स्थायी समिती सभा दिनांक - 11/07/2019 विषय क्रं. 2 ठराव क्रं. 109 नुसार जाहिरात परवानगी शुल्कास मान्यता दिलेली आहे.

सदयस्थितित मनपाचे जाहिरात धोरण अस्तित्वात आहे. महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक 09 मे 2022 प्रमाणे जाहिराती / बॅनर / फलक लावणे करीता निर्णय पारीत झाला आहे. तसेच जाहिरातीचे दृष्टीने मनपाचे मुख्य रस्ते, खुल्या जागा व इमारती यांचे सर्वेक्षण झाले असून जाहिरातीचे ठिकाणे निश्चित केलेली आहेत. जाहिरातीचे दर ठरविताना मनपा व खाजगी जागांवरिल जाहिरात कराचे दर सारखेच ठेवल्यास मनपाचे जागेवर देखील चांगला प्रतिसाद मिळेल, जाहिरात कराचे दर निश्चित करताना मनपा, खाजगी व शासकीय जागा असे दर निश्चित करणे योग्य राहिल. सदयस्थितीत अस्तित्वात असलेले दर हे कमी असल्याने जाहिरात कराचे दरामध्ये वाढ करणे बाबत खालीलप्रमाणे जाहिरात कराचे दरा बाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे योग्य राहील.

जाहिरात परवानगी शुल्क

अ.क्रं.	जाहिरातीचा प्रकार		मा. स्थायी समिती सभा दिनांक - 11/07/2019 अन्वये निश्चित केलेले दर प्रती चौरस फुट करीता.	प्रस्तावित जाहिरात दर प्रति चौरस फुट करीता.
1	**जाहिरात फलक, कापडी फलक (तात्पुरते स्वरुपातील)**		3.13 प्रति चौ. फुट 10 फुटापर्यंत 10 फुटापेक्षा जास्त पण 20 फुटपेक्षा कमी असेल तर 6.25 प्रति चौ.फुट	प्रति दिवस 3/- रु फुट (जागा भाडे व जाहिरातीकरीताचे परवानगी शुल्क
2	**विदयुत खांबावरील किऑक्स**		12.50 प्रति महा प्रति बाजू साईज (4x3)	15 प्रति महा प्रति बाजू साईज (4x3)
3	**डिजीटल एल ई डी वॉल**	**महानगरपालिका जागेवरील**	रु. 35/- प्रती महा	रु. 35/- प्रती महा
		खाजगी जागेवरील	रु. 25/- प्रती महा	रु. 25/- प्रती महा
		महानगरपालिका जागेवरील -		
		1) रोषनाई	प्रति फुट 5/- रु प्रती महा	3. जागा भाडे 30/- रु चौ. फुट

Scanned with OKEN Scanner

4	**होर्डींग्ज**	नसलेले जाहिरात फलक 2) रोषनाई असलेले जाहिरात फलक	जागा भाडे + प्रति चौ.फुट 1.56 जाहिरात कर प्रति महा प्रति फुट 5/- रु प्रति महा जागा भाडे+ प्रति चौ.फुट 1.88 जाहिरात कर प्रति महा	जाहिरात परवाना शुल्क 30/- रु चौ.फुट 4. जागा भाडे 40/- रु चौ. फुट जाहिरात परवाना शुल्क 40/- रु चौ.फुट
		खाजगी जागेवरील/ ईमारतीवरील-		
		1) रोषनाई नसलेले जाहिरात फलक 2) रोषनाई असलेले जाहिरात फलक	प्रति चौ.फुट 1.56 प्रति महा प्रति चौ.फुट 1.88 प्रती महा	जाहिरात परवाना शुल्क 30/- रु चौ.फुट प्रति महा
5	**गॅट्री (मुख्य रस्त्यावरील लोखंडी प्रवेशव्दार)**		रु. 15/- प्रती महा	
6	**रोड शो -** 1) फिरते वाहन 2) फिरते ॲटो / सायकल रिक्षा 3) आकाशातील प्रदर्शन (बलुन)		रु. 500/- प्रती दिवस रु. 50/- प्रती दिवस रु. 300/- प्रती दिवस	रु. 1000/- प्रती दिवस रु. 300/- प्रती दिवस रु. 1000/- प्रती दिवस

खालील अटी व शर्ती लागू करणे योग्य राहील.

1. शासकीय योजनांचे प्रचार / प्रसार, आनीबाणी काळामध्ये व निवडणुक काळामध्ये जाहीरात एजन्सीचे जाहीरात काढुन घेण्याचे तसेच त्या जाहीरात फलकांवर जाहीरात लावण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना असतील.
2. जाहिरात लावण्यासाठी 03 वर्षा करिता खाजगी जागेवर लावण्यासाठी परवानगी देण्यात येईल.
3. महानगरपालिकेचे आर्थिक उत्पन्नात वाढ होण्याच्यादृष्टीने ज्या इमारतीवर जाहिरात फलक (होर्डींग) उभारणे आहे. त्यांचे बांधकाम परवानगी / भोगवटा प्रमाणपत्राच्या अटीमध्ये शिथीलता देऊन संबंधीत एजन्सी धारकाकडून जबाबदारीसंबंधीचे शपथपत्र घेवुन परवानगी देणेस मान्यता देण्यात येईल.
4. जाहिरात खाजगी जागेवर लावायची असल्यास संबंधीत खाजगी जागा इमारतीचे Stability Certificate तसेच संबंधीत इमारत धारकांचे शपथपत्र देणे बंधनकारक आहे .

Scanned with OKEN Scanner

5. खाजगी जागेवर कोणतीही अनामत रक्कम आकारता येणार नाही, ही आकारु नये तसेच मनपाच्या जागेवर अनामत रक्कम आकारण्यात येईल.

6. वरील जाहीरातीचे दर, हे दर दोन वर्षाला 10% वाढ करण्यात येईल .

7. मनपाच्या जागेवर जाहिराती बाबत परवानगीचे नियम व अटी निश्चित करुन परवानगी देण्यास मा. आयुक्त, लाशमनपा लातूर यांना अधिकार राहतील.

तरी वरीलप्रमाणे जाहिरात दर निश्चित करण्यात आल्यास लातूर शहर महानगरपालिकेच्या आर्थिक उत्पन्नात वाढ होणार आहे.

निर्णय :-

उपरोक्त प्रस्तावानुसार लातूर शहर महानगरपालिका, लातूर मालकीच्या जागेवर, खाजगी जागेवर / इमारतीवर कायम स्वरुपी व तात्पुरत्या लावण्यात येणा-या जाहिराती / होर्डींग्ज जाहिरात करामध्ये प्रस्तावीत करण्यात आलेल्या दरास मान्यता देण्यात येत आहे.

नगर सचिव
लातुर शहर महानगरपालिका, लातुर

आयुक्त
लातुर शहर महानगरपालिका, लातुर

Scanned with OKEN Scanner

लातूर शहर महानगरपालिका लातूर

प्रशासकीय ठराव

ठराव क्र :- 81

दि. 22/02/2023

.....

.....

विषयः- भटके श्वान निर्बीजीकरण व लसीकरण देखरेख समिती स्थापन बाबत प्राणी छळ कायदा १९६० व प्राणी जन्मदर नियंत्रण नियम २००१

लातूर शहर महानगरपालिकेच्या मंजुर आकृतीबंधानुसार मंजूर असलेले पशुवैद्यकीय अधिकारी हे पद सन २०११-१२, २०१२-१३, २०१३-१४, २०१४-१५, व २०१५-१६ या वित्तीय वर्षात हे पद रिक्त होते. त्याप्रमाणे प्राणी जन्मदर नियंत्रण (कुत्री) नियम 1960 AR 2001 नुसार देखरेख समिती स्थापन केलेली नसल्याने प्राणी छळ कायदा १९६० अन्वये भटके श्वान निर्बीजीकरण व लसीकरणाचे कामकाज होऊ न शकल्याने सदर कामे प्रलंबित राहिली होती. तथापि दिनांक ०४/०१/२०१७ रोजी पशुवैद्यकीय अधिकारी हे पद (मानधन तत्वावर) भरले असुन देखरेख समितीची स्थापना दिनांक २५/०१/२०१७ रोजी केली आहे. त्यानंतर भटके श्वान निर्बीजीकरण व लसीकरणाचे कामकाज नियमीतपणे करण्यात आलेले आहे.

निर्णय / ठराव

पशुवैद्यकीय अधिकारी हे पद दिनांक ०३/०१/२०१७ पर्यंत रिक्त असल्याने आणि दिनांक २४/०१/२०१७ पर्यंत देखरेख समिती स्थापन न केल्याने सन २०११-१२, २०१२-१३, २०१३-१४, २०१४-१५, व २०१५-१६ मधील लेखापरिक्षण अहवालात नमुद केल्याप्रमाणे भटके कुत्रे निर्बीजीकरणाचे काम करता येणे शक्य न झाल्याने सदर बाबीस "क्षमापन" देऊन कार्योत्तर मंजुरी करण्यात येत असुन ठराव मान्य करण्यात येत आहे.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका लातूर

आयुक्त तथा प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका,लातूर

दिनांकः 24/07/2023

प्रशासकीय ठराव क्र. 82 **अग्निशमन विभागासाठी अत्याधूनिक असे अग्निशमन वाहन Design,Construction, Fabrication, Erection,** Testing and Commissioning of Multipurpose Fire Foam Tender on 19 Ton GVW BS-VIChassis व बॉडी बांधकामसह खरेदी करणे.करिता महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानातील जिल्हास्तर अभियान व बळकटीकरण योजने अंतर्गत सन 2022-23 च्या जिल्हा वार्षिक योजनेतून निधी इतर उपलब्ध निधीतून अंदाजे रक्कम रूपये रू. 3.15 कोटी निधी मागणी करणे बाबत.

प्रस्तावः-

लातूर शहर महानगरपालिका लातूर अग्निशमन विभागाकडे एकूण विविध प्रकारचे | वॉटर टेंडर-4,रेस्क्यू टेंडर-1, फोम टेंडर-1,रूग्णवाहिका-1,नविन मल्टीपर्पज fire Tender-1,असे एकूण 08 वाहने आहेत.त्यापैकी एक फोम टेंडर बंद (पंप काम करत नाही) आहे व 1 नविन आहे व इतर वाहने पूर्ण पणे जूने/खराब झाले आहेत ते 12-15 वर्ष जूने झाले आहेत व सतत बंद पडत आहेत.शासकीय परिपत्रकानुसार 10 वर्षा पूर्विचे वाहने निकामी करून नविन वाहने खरेदी करणे च्या सुचना आहेत.

सध्या लातूर शहर व परिसरात ओदयोगिक वसाहत खुप मोठ्या प्रमाणात विस्तारित होत आहे सततंच लहान-मोठे आगीच्या दुर्घटना घडतात. त्यातल्या त्यात शहरात मोठ्या प्रमाणात बाजार पेठ आहे.अशा ठिकाणी लहान आग लागली तरिही 1 - 2 उपलब्ध अग्निशमन वाहने पाठवावी लागतात सध्या स्थितीत लातूर अग्निशमन विभागाकडे 1 च नविन मल्टीपर्पज fire Tender उपलब्ध आहे लातूर शहर महानगरपालिका,लातूर च्या अग्निशमन विभागा करिता आग-आपत्ती प्रसंगी व VIP बंदोबस्त/ कॅनव्हाय मध्ये समाधान कारक कार्य करणे आणि जिवित व वित्त हानी टाळणे करिता खलिल अत्याधूनिक अग्निशमन वाहने व साहीत्याची आवश्यकता आहे.

आ.क्र.	वाहनाचा तपसिल	नग	अंदाजे अपेक्षित खर्च
1	अत्याधुनिक असे अग्निशमन वाहन MULTIPURPOSE FIRE FOAM TENDER खूलि चेचीस व बॉडी बांधकाम सह.	02	3,15,00,000/-
	अंदाजे एकूण	**02**	**3,15,00,000/-**

जिल्हा वार्षिक योजना सन- 2022-23 अंतर्गत अग्निशमन व आणीबाणी सेवांचे बळकटिकरण करणे जिल्हा स्तरीय योजने अंतर्गत अनुदान एकूण रक्कम रू.3.15. कोटी निधी उपलब्ध करून देणे बाबत अग्निशमन व आणीबाणी सेवांचे बळकटिकरण करणे जिल्हास्तरीय योजने अंतर्गत चार Design,Construction, Fabrication, Erection, Testing and Commissioning of Multipurpose Fire Foam Tender on 19 Ton GVW BS6-15 टन खूलि चेचीस व बॉडीबांधकामसह खरेदी करणे करिताकमी-जास्त प्रमाणात अंदाजे रक्कम रू.3.15 कोटी खर्च अपेक्षित आहे.

तेंव्हा जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजना सन 2022-23 मधून अग्निशमन सेवांचे बळकटीकरण करिता लातूर शहर मनपा.अग्निशमन व आणीबाणी सेवा विभागास वरिल प्रमाणेचे वाहन खरेदीसाठी रक्कम रू.3.15 कोटी अनुदान मागणी प्रस्ताव आर्थिक व प्रशाकिय मानस्तेस्तव सादर.

निर्णयः- अत्याधुनिक अग्निशमन वाहने खरेदी करिता रू.3.15 कोटी जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजना सन 2022-23 मधून अग्निशमन सेवांचे बळकटीकरण करिता लातूर शहर मनपा.अग्निशमन व आणीबाणी सेवा विभागास वरिल प्रमाणेचे वाहन खरेदीसाठी रक्कम रू.3.15 कोटी अनुदान मागणी प्रस्ताव पाठविणेस मान्यता देण्यात येते.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका,लातर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

ठराव क्रं. 83 दिनांक 27/02/२०२३

विषय - लातूर महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोयी सुविधांच्या विकास योजना (लेखाशिर्ष-४२१७०५४१) अंतर्गत मिळालेल्या अनुदानातुन कामे प्रस्तावित करणे बाबत.

संदर्भ : १. मा. अवर सचिव, नगर विकास विभाग यांचे पत्र क्र. पुरक-२०१८/प्र.क्र. ९८(०५) /नवि-१६ दि. ०३.०९.२०१८.
२. नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. मनपा- २०१९/प्र.क्र.५३/नवि-१६ दिनांक ०८ मार्च २०१९
३. कक्ष अधिकारी, नगर विकास विभाग यांचे पत्र क्र. पुरक-२०१८/प्र.क्र. ९८(५) /नवि-१६ दिनांक १८ जून २०२१.
४. शासन निर्णय नगर विकास विभाग क्र. धोरण- २०१७/प्र.क्र. ६/नवि-१६ दिनांक १२.१२.२०१७
५. शासन निर्णय नगर विकास विभाग क्र. धोरण-२०१७/९६/नवि-१६ दिनांक ३०.०९.२०२०
६. महाव्यवस्थापक (सौर) यांचे तांत्रिक मंजूरी पत्र क्रं.आरइएन/लातूर मनपा/ २०२१-२२/सौर/५०४२ दिनांक ०३.१२.२०२१.
७. विभागीय महाव्यवस्थापक, महाऊर्जा, विभागीय कार्यालय, लातूर यांचे पत्र क्र. वि.का. लातूर/ अमृत/२०२१-२२ /११ दिनांक ०५.०१.२०२१.
८. मा. विभागीय आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली झालेली जिल्हास्तरीय बैठक दिनांक १६.०२.२०२२.
९. विभागीय महाव्यवस्थापक, महाऊर्जा विभागीय कार्यालय, लातूर यांचे पत्र क्र. वि.का. लातूर/सौर/ २०२१-२२ /११८ दिनांक १६.०२.२०२२.
१०. क्रं. २०२१ नपाप्र/आरटीएस/कावि दि. २८.१२.२०२१
११. या कार्यालयाचे पत्र क्रं. जा.क्रं.लाशमनपाला/पा.पु./४४१४/२०२२-२३ दि. ०६.०७.२०२२

सादर,

उपरोक्त विषयी सविनय सादर करण्यात येते की, संदर्भ क्र.१ च्या पत्रान्वये लातूर शहर महानगरपालिकेसाठी ५ मेगावॅट क्षमतेच्या सौर उर्जा प्रकल्पाकरिता लेखाशिर्ष (४२१७०५४१) मधून रु. १६.०० कोटी निधी मंजूर करण्यास तत्वतः मान्यता देण्यात आली होती व संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयान्वये सदर निधी मंजूर करून वितरीत करण्यांत आला होता. कामाकरिता कार्यान्वयन यंत्रणा म्हणून सार्वजनिक बांधकाम विभाग निश्चित करून देण्यात आली होती. तथापि लातूर शहर महानगरपालिकेने शासनास विनंती केल्यावरुन या कामासाठी संदर्भ क्रं. ३ च्या पत्रान्वये नगर विकास विभागाने कार्यान्वयन यंत्रणा सार्वजनिक बांधकाम विभाग ऐवजी "महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण MEDA निश्चित केलेली होती. संदर्भ क्र. ४ च्या शासन निर्णयान्वये या योजने अंतर्गत कार्यान्वयन यंत्रणेने तात्रिक मान्यता दिलेल्या प्रस्तावाची छाननी करुन शासनास प्रस्ताव सादर करणे करिता मा. विभागीय आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती गठीत केली होती व समितीने प्रस्तावाची सविस्तर छाननी करून प्रशासकीय मान्यतेस्तव प्रस्ताव शासनास सादर करण्याचे निर्देश होते व प्रशासकीय मंजूरीचे अधिकार शासनास होते. संदर्भ क्र. ५ च्या पत्रान्वये जिल्हास्तरीय समितीच्या शिफारसी अंती प्रशासकीय मंजूरीचे अधिकार जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहेत.

या योजने अंतर्गत लातूर शहर महानगरपालिकेसाठी मौजे पाथरवाडी ता. रेणापूर जि. लातूर येथे २.५ मेगावॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प आस्थापित करणेचा प्रस्ताव (MEDA) ने कार्यान्वीत केला त्याची अंदाजपत्रकीय रक्कम रु. १२,०७,८०,०००/- इतकी आहे. संदर्भ क्र. ६ अन्वये महाव्यवस्थापक (सौर) यांनी सदर प्रस्तावास तांत्रिक मंजूरी प्रदान केली व संदर्भ क्र. ७ अन्वये कार्यान्वयन यंत्रणा म्हणून विभागीय महाव्यवस्थापक महाऊर्जा विभागीय कार्यालय लातूर यांनी लातूर शहर महानगरपालिकेच्या सर्व आवश्यक नाहरकत प्रमाणपत्रासह व तांत्रिक मंजूरी आदेश व प्रकल्प अहवालासह प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेस्तव या कार्यालयास सादर केला. सदर प्रस्ताव जिल्हास्तरीय समितीच्या शिफारसीकरिता सादर केला असता संदर्भ क्र. ८ अन्वये झालेल्या जिल्हास्तरीय समितीच्या बैठकीत असे ठरले की शासनाने ५ मेगावॅट क्षमतेच्या सौर उर्जा प्रकल्पासाठी रु. १६ कोटी निधी मंजूर केला असून MEDA ने २.५ मेगावॅट क्षमतेचा रक्कम रु. १२,०७,८०,०००/- प्रस्ताव

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय मान्यतेस्तव सादर केला आहे. संदर्भ क्रं. १० अन्वये महाराष्ट्र ऊर्जा विकास प्राधिकरणास रक्कम रु. १२,०७,८०,०००/- मुलभुत सेवासुविधा योजने अंतर्गत वर्ग करण्यांत आली असुन संदर्भ क्रं. ११ व्दारे सदर प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यासाठी जिल्हास्तरीय समितीची बैठक आयोजित करण्यासाठी कळविण्यात आले आहे. उपरोक्त प्राप्त निधी रक्कम रु. १६.०० कोटी मधुन २.५ मेगावॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प अस्थापित करण्यासाठी अंदाजपत्रकीय रक्कम रु. १२,०७,८०,०००/- इतकी असुन रक्कम रु. ३,९२,२०,०००/- रक्कम इतकी शिल्लक राहत आहे. मौजे. पाथरवाडी येथे मनपा मालकीची २० एकर जमिन असुन सदर जमिनीवर सौर ऊर्जा प्रकल्प प्रस्तावित आहे. सदर जमिनीस तारेचे कुंपण करुन घेणे अत्यावश्यक असुन कुंपण न केल्यास सदर जागेवर अतिक्रमण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच मनपा मालकीच्या नसलेल्या शाळेंचे बांधकाम खुप वर्षापुर्वी झाले असल्या कारणाने त्या शाळेंचे स्लॅब गळुन पडत आहेत. महानगरपालिका शाळांचे अधुनिकीकरणाची कामे प्रस्तावित करण्यांत येत आहेत. उपरोक्त तिन्ही कामांचे अंदाजपत्रक तयार केले असुन कामाची एकुण किंमत ३,९२,२०,०००/- होत आहे.

निर्णय :- लातूर शहर महानगरपालिकेसाठी ५ मेगावॅट क्षमतेच्या सौर उर्जा प्रकल्पाकरिता लेखाशिर्ष (४२१७०५४१) मधून रु. १६.०० कोटी निधी मंजूर करण्यास तत्वतः मान्यता देण्यात आली होती. शासन निर्णयान्वये सदर निधी मंजूर करून वितरीत करण्यांत आला होता. परंतू या योजने अंतर्गत लातूर शहर महानगरपालिकेसाठी मौजे पाथरवाडी ता. रेणापूर जि. लातूर येथे २.५ मेगावॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प आस्थापित करणेचा प्रस्ताव (MEDA) ने कार्यान्वीत केला त्याची अंदाजपत्रकीय रक्कम रु. १२,०७,८०,०००/- इतकी आहे. सदर रक्कम रु. १२,०७,८०,०००/- २.५ मेगावॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्प अस्थापित करण्यासाठी महाराष्ट्र ऊर्जा विकास प्राधिकरणास वर्ग करण्यांत आली आहे. उर्वरीत शिल्लक रक्कम रु. ३,९२,२०,०००/- यामधुन खालील प्रमाणे कामे प्रस्तावित करण्यांत यावी.

अ.क्रं.	कामाचे नांव	अंदाजपत्रकीय किंमत
1.	Proposed Construction of Compound wall at Patharwadi Dist. Latur	99,98,111.00
2.	Proposed Repairs and renovation work of MNP School Building at various places in Latur City.	1,99,90,942.00
3.	Proposed Construction of Rooms & Toilet at Patharwadi and School Digitalisation at various LCMC School For M.C.Latur	92,30,947.00
	Total Rs.	**3,92,20,000.00**

उपरोक्त प्रमाणे सदर कामाचे प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, लातूर यांच्याकडे पाठविण्यास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येते.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका, लातूर

ठराव क्र :- ४५ ग्रंथालय विभाग दि. ८/३/२०२३

विषय : - मनपा तर्फे झोन निहाय वाचनकट्टयाचे नियोजन करणे बाबत

प्रस्तावना :- मा. आयुक्त यांच्या आढावा बैठक दि. २०/१२/२०२२ रोजी झालेल्या बैठकीत सर्व क्षेत्रीय अधिकारी यांनी,आपल्या कार्यक्षेत्रात स्थानिक नागरीकांच्या समितीच्या माध्यमातून प्रस्तावासह वाचनकट्टया बाबत झोन मधील स्थळ निश्चित करण्याविषयी सुचना दण्यात आल्या होत्या त्याप्रमाणे सर्व क्षेत्रीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रभागातील माहिती खालील प्रमाणे सादर करण्यात आली.

झोन A - १) सोहेल नगर ग्रीन बेल्ट
२) LIC ऑफीस समोर
३) राधाई डेव्हलपर्स आंबा हनुमान चौक, आंबाजोगाई रोड
४) जुनी शासकिय वसाहत कॉलनी मुंदडा डेअरीच्या बाजुला

झोन B - १) टागोर नगर ग्रीन बेल्ट
२) कव्वा रोड चन्नाबसवेश्वर कॉलेज समोर अज्जी अजोबा नवाने असलेला वट्टा.

झोन C - १) वकिल सोसायटी ग्रीन बेल्ट
२) बालाजी नगर राजा शिव्द्योदन ग्रीन बेल्ट
३) शाहु नगर ग्रीन बेल्ट

झोन D - १) S.T. वर्कशॉप, आंबेजोगाई रोड
२) नाना-नानी पार्क

निर्णय :- वाचनकट्टया बाबत प्राप्त स्थळ माहितीच्या आधारे सदरील ठिकाणी मनपाच्या श्री शिवछत्रपती ग्रंथालय तर्फे त्याठिकाणी वाचकांना दैनंदिन जास्तीत जास्त १० व्रत्तपत्रे (त्यामध्ये मराठी, हिंदी तसेच मागणीनुसार इंग्रजी, उर्दु) उपलब्ध करुन एक रॅक मध्ये सदरील व्रत्तपत्रे ठेवण्याची व्यवस्था करण्यात यावी सदरील रॅक हे काँक्रीट मध्ये रोऊन फिक्स करण्यात यावे.

सर्व झोनल यांच्या प्राप्त माहितीवरुन प्रत्येक झोन मध्ये प्रत्येकी दोन वाचन कट्टे निर्माण करण्यात यावे ते याप्रमाणे

झोन A - १) सोहेल नगर ग्रीन बेल्ट
२) जुनी शासकिय वसाहत कॉलनी मुंदडा डेअरीच्या बाजुला कंम्पाऊडला लागुन बेंच ठेवले त्याठिकाणी.

झोन B - १) टागोर नगर ग्रीन बेल्ट
२) कव्वा रोड चन्नाबसवेश्वर कॉलेज समोर अज्जी अजोबा नवाने असलेला वट्टा.

झोन C - १) बालाजी नगर राजा शिव्द्योदन ग्रीन बेल्ट
२) शाहु नगर ग्रीन बेल्ट

झोन D - १) S.T. वर्कशॉप, आंबेजोगाई रोड
२) नाना-नानी पार्क

Scanned with OKEN Scanner

वरील प्रमाणे वाचनकडुवाच्या निर्वाचीय आर्थिक व प्रशासकीय मंजुरी सर्वानुमते देण्यात येते.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका लातूर

आयुक्त तथा प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका लातूर

Scanned with OKEN Scanner

लातूर शहर महानगरपालिका लातूर

प्रशासकीय ठराव

ठराव क्र :- 85 दि. 8/3/2023

.....

.....

विषयः- पकडण्यात आलेले मोकाट जनावर पहिल्या वेळेस कोंडवाडयात दाखल केल्यानंतर सात दिवसात मालक आल्यास जनावरास परत करताना आकारण्यात येणारी दंडाची रक्कम रुपये 3000/- राहील व दुस-या वेळेस त्याच मालकाचे मोकाट जनावर पकडल्यास आकारण्यात येणारी दंडाची रक्कम 6000/- रुपये राहील तिस-या वेळेस त्याच मालकाचे मोकाट जनावर पकडुन कोंडवाडयात दाखल केल्यास थेट जप्तीची कार्यवाही करण्यात येईल.

लातूर शहर महानगरपालिकेच्या हद्दीत मोकाट जनावरांची संख्या वाढलेली असल्यामुळे रहदारीस अडथळा व लहान मोठे अपघाताची घटना घडत आहेत. पकडण्यात आलेले मोकाट जनावर पहिल्या वेळेस कोंडवाडयात दाखल केल्यानंतर सात दिवसात मालक आल्यास जनावरास परत करताना आकारण्यात येणारी दंडाची रक्कम रुपये 3000/- राहील व दुस-या वेळेस त्याच मालकाचे मोकाट जनावर पकडल्यास आकारण्यात येणारी दंडाची रक्कम 6000/- रुपये राहील तिस-या वेळेस त्याच मालकाचे मोकाट जनावर पकडुन कोंडवाडयात दाखल केल्यास थेट जप्तीची कार्यवाही करण्यात येईल.

तसेच बाहेरगावी गोरक्षणाशी करार झाल्यास दंडाची रक्कम रुपये 5000/- (+) वाहतूक खर्च प्रति जनावर महापालिकेकडे जमा करणे बाबत मा. आयुक्त, व मा.उपायुक्त यांच्याशी चर्चाअंती असा प्रस्ताव सादर करण्यासाठी मान्यता देण्यात आली.

तरी सदरील विषय मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्याकडे प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

निर्णय / ठराव

पकडण्यात आलेले मोकाट जनावर पहिल्या वेळेस कोंडवाडयात दाखल केल्यानंतर सात दिवसात मालक आल्यास जनावरास परत करताना आकारण्यात येणारी दंडाची रक्कम रुपये 3000/- राहील व दुस-या वेळेस त्याच मालकाचे मोकाट जनावर पकडल्यास आकारण्यात येणारी दंडाची रक्कम 6000/- रुपये राहील तिस-या वेळेस त्याच मालकाचे मोकाट जनावर पकडुन कोंडवाडयात दाखल केल्यास थेट जप्तीची कार्यवाही करण्यास मंजुरी करण्यात येत असुन ठराव मान्य करण्यात येत आहे.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका लातूर

आयुक्त तथा प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका, लातूर

ठराव क्रमांक - 86 दिनांक. 9 / 3 / 2023

विषय- लातूर शहर पाणी पुरवठा योजना सन 2023-24 (देखभाल व दुरुस्ती) लिकेजस काढणे, पंपींग मशिनरी, यांत्रिकी व विदयुत सबपंप दुरुस्ती कामे व रसायने पुरवठा करणे.

प्रस्ताव -

उपरोक्त विषयास अनुसरून सादर करण्यात येते की, लातूर शहर महानगरपालिकेच्या मालकीची लातूर शहर पाणी पुरवठा योजना अंतर्गत उदभव धनेगाव धरण व साई मांजरा नदी पात्र तसेच हरंगुळ, आर्वी जलशुध्दिकरण केंद्र व अस्तित्वातील मलनिसा:रण केंद्र येथील पंपींग मशिनरी आणि यांत्रिकी व विदयुत उपकरणे खोल फिटींग, रिवायडींग करणे,पाणी शुध्दिकरण व निरजंतुक रसायने पुरवठा करणे इत्यादी कामे करणे.

तसेच मांजरा धरण, साई नदी पात्रातील मुख्य उदभव ठिकाण उध्दरणनलिका, गुरूत्व वाहीनी नलिका, जलकुंभ वितरण व्यवस्था इत्यादीची दुरुस्ती करणे, गळती काढणे, एअर व्हाल्व, स्लुस व्हाल्व, रिप्लेक्स व्हाल्व दुरुस्ती करणे व लागणारे साहित्य पुरवठा व फिटींग करणे, फ्लोमीटरची दुरुस्ती करणे, लातूर शहरातील विविध ठिकाणी विंधन विहीरीवरील विदयुत सबपंप व हातपंप बसविले असुन त्याची खोलफीटींग करणे, जी.आय.पाईप, सबमर्सिबल केबल पुरवठा व फीटींग करणे इत्यादी उपरोक्त सर्व दुरुस्तीची कामे करून समाधानकारक चाचणी देणे. सदर कामासाठी मनपाकडे कुशल तांत्रिक कर्मचारी उपलब्ध नसल्यामुळे,योजना देखभाल दुरुस्ती करीता कुशल व अकुशल कर्मचारी नेमणे. लातूर शहर पाणी पुरवठा योजना सुरळीत कार्यान्वयीत ठेवण्याच्या दृष्टीकोनातुन वेळोवेळी दुरुस्ती कामे करावी लागत असुन अशा उदभवणा-या दुरुस्ती करणेसाठी स्वतंत्ररीत्या कोटेशन मागवुन किंवा निविदा बोलावुन दुरुस्त्या कराव्या लागतात त्यासाठी वेळेत दुरुस्ती करावयाची असल्याने वेळोवेळी कोटेशन किंवा निविदा काढण्यास बराच वेळ जातो. त्यामुळे शहरास पाणीपुरवठा करणेस विलंब होतो.(वरील सर्व कामे लेखाशिर्षकात तरतुद आहेत)

त्याकरीता सदरील योजनेच्या पंपींग मशनरी व सयंत्राच्या दुरुस्ती नियमित होतील व योजना सुरळीत कार्यान्वीत राहिल. दुरुस्ती कामाचे स्वरूप प्रत्येक लेखाशिर्षकाप्रमाणे वार्षिक ई-निविदा मागवणे करीता प्रस्ताव मान्यतेस्तव व निर्णयास्तव सादर.

निर्णय -

लातूर शहर पाणी पुरवठा योजना अंतर्गत धनेगाव, साई हेडवर्क्स, हरंगुळ व आर्वी जलशुध्दिकरण केंद्र येथील पंपींग देखभाल दुरुस्ती करणे, विदयुत/यांत्रिकी, अशुध्द पाणी निर्जंतुकीकरण करणेसाठीचे रसायने तुरटी, ब्लिचिंग, क्लोरींन गॅस, PAC पावडर, CL^2 इ., अस्तित्वातील मलनिस्सारण योजना (खोरे गल्ली) येथील वार्षिक देखभाल दुरुस्ती, मिनी वॉटर सप्लाय विंधन विहीरीवरील नादुरुस्त पंप काढणे व दुरुस्ती करून बसविणे, हातपंप दुरुस्ती करून बसविणे, नविन जी आय पाईप,मोटार पंप इ.नविन साहित्य पुरवठा करणे. धनेगाव, हरंगुळ, आर्वी, साई व शहरातील जलकुंभावरील पाणी पुरवठा देखभाल दुरुस्ती,वितरण व्यवस्था करणे,लिकेजस काढणे, व्हॉल्व व पाईप लाईन दुरुस्ती करणे व नविन साहित्य पुरवठा करणे इ.,मिनीवॉटर वॉटर सप्लाय पाईप लाईन लिकेजस काढणे व व्हॉल्व्ह दुरुस्ती व नविन साहित्य पुरवठा करणे. कुशल व अकुशल कर्मचा-यांची नेमनुक करणे या कामांची वार्षिक निविदा काढुन कामे करून घेंण्यास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

नगरसचिव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकिय ठराव

लातूर शहर महानगरपालिका,लातूर

ठराव क्र. 817 दि. 9/3/२०२३

विषय – घनकचरा व्यवस्थापना साठी ५० टन TPD Construction and Demolition Waste Plant With Manufacturing Blocks for Latur City Municipal Corporation, Latur

प्रस्ताव –

घनकचरा व्यवस्थापन २०१६ दिनांक २९ मार्च २०१६ यांचे सामान्य वैधानिक नियम GSR ३१७-E नियम क्रमांक ८ (१) व ९ (१) आणी मा.हरीत लवादर यांचे निर्देष केस नंबर-२/१०१९ दिनांक १४/०१/२०२० यांचे पालन करता बांधकाम कच-याचे नियमन करणे, सकंलन करणे आणी त्या प्रक्रिया करणे करीता मा. आयुक्त तथा प्रशासक महोदय यांचे मान्यतेनूसार दि.०८.०२.२२३ रोजी GEM पोर्टलवर निवीदा प्रकाशीत करण्यात आली होती. निवीदा क्र. GEM/2023/B/3102896 च्या विहीत वेळेत ३ निवीदा धारक प्राप्त झाले आसून पात्र निवीदाधारकांचा लिफाफा दि.०२.०३.२०२३ रोजी उघडण्यात आला तरी सदर निवीदेमध्ये दिलेले दर खालील प्रमाणे आहेत.

अ.क्र	कंत्राटदाराचे नाव	रक्कम
१	NEW SAI FIBER	3,99,98,520/-
२	MEERA STEEL FABRICATION AND FIBERS	4,15,50,000/-
३	HIND AGRO CHEMICALS	4,25,00,000/-

तरी प्राप्त निवीदाधारका पैकी **NEW SAI FIBER** चे दर रू. ३,९९,९८,५२०/- (अक्षरी तीन कोटी नव्यानव लक्ष अठ्यानव हजार पाचशे वीस रूपये) सर्वात कमी असून **NEW SAI FIBER** यांना कार्यादेश देण्याचे उचित निर्णयास्तव सादर.

निर्णय – घनकचरा व्यवस्थापना साठी ५० टन TPD Construction and Demolition Waste Plant With Manufacturing Blocks for Latur City Municipal Corporation, Latur या कामासाठी सर्वात कमी दर **NEW SAI FIBER यांचे रू. 3,99,98,520/-** यांचे दरास अर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येते.

नगर सचिव

लातूर शहर महागरपालिका,लातूर

प्रशासक

लातूर शहर महानगरपालिका,लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकिय ठराव

लातूर शहर महानगरपालिका,लातूर

दि. 9/3/२०२३

ठराव क्र. 88

विषय – घनकचरा प्रक्रियासाठी १५० TPD Processing Plant प्रकल्प उभारणी बाबत.

प्रस्ताव –

शासन निर्णय क्र. स्वच्छ महाराष्ट्र अभियान २०१८ प्र.क्र १७५ नगर विकास विभाग -३४ दि १२ एप्रिल २०१८ च्या मान्यते नूसार लातूर शहर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन DPR ला मान्यता प्राप्त झाली आहे. अनुषंगाने मंजूर DPR मधील अ.क्र ९ नूसार Processing Plant 150 TPD प्रति दिवस उभा करणे करीता मा. आयुक्त तथा प्रशासक महोदय यांचे मान्यतेनूसार दि.०८.०२.२२३ रोजी GEM पोर्टलवर निवीदा प्रकाशीत करण्यात आली होती. निवीदा क्र. GEM/2023/B/3103065 च्या विहीत वेळेत ३ निवीदा धारक प्राप्त झाले आसून पात्र निवीदाधारकांचा लिफाफा दि.०२.०३.२०२३ रोजी उघडण्यात आला तरी सदर निवीदेमध्ये दिलेले दर खालील प्रमाणे आहेत.

अ.क्र	कंत्राटदाराचे नाव	रक्कम
१	NEW SAI FIBER	3,89,99,970/-
२	MEERA STEEL FABRICATION AND FIBERS	4,07,25,000/-
३	HIND AGRO CHEMICALS	4,15,00,000/-

तरी प्राप्त निवीदाधारका पैकी **NEW SAI FIBER** चे दर रू. ३,८९,९९,९७०/- (अक्षरी तीन कोटी एकोणनव्वद लक्ष नव्यानव हजार नऊशे सत्तर रूपये) सर्वात कमी असून **NEW SAI FIBER** यांना कार्यादेश देण्याचे उचित निर्णयास्तव सादर.

निर्णय – घनकचरा प्रक्रियासाठी १५० TPD Processing Plant प्रकल्प उभारणी करीता या कामासाठी सर्वात कमी दर NEW SAI FIBER यांचे रू. 3,89,99,970/- यांचे दरास अर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येते.

नगर सचिव

लातूर शहर महागरपालिका,लातूर

प्रशासक

लातूर शहर महानगरपालिका,लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकिय ठराव

लातूर शहर महानगरपालिका,लातूर

ठराव क्र. 89 दि. 9/3/२०२३

विषय – ३ टनाचे दोन टिप्पर खरेदी करणे बाबत.

प्रस्ताव –

शासन निर्णय स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत २०१८ प्र.क्र १७५ नगर विकास ३४ दि.१२ एप्रिल २०१८ च्या मान्यते नूसार लातूर शहर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन DPR ला मान्यता प्राप्त असून, त्यानूसार DPR 2018 अ.क्र ४ नूसार ३ टन टिप्पर खरेदी करणे करीता. मा. आयुक्त तथा प्रशासक महोदय यांचे मान्यतेनूसार दि.०९.०२.२२३ रोजी GEM पोर्टलवर निवीदा प्रकाशीत करण्यात आली होती. निवीदा क्र. GEM/2023/B/3109000 च्या विहीत वेळेत ४ निवीदा धारक प्राप्त झाले आसून १ निवीदा धारक अपात्र झाल्याने पात्र ३ निवीदाधारकांचा लिफाफा दि.०२.०३.२०२३ रोजी उघडण्यात आला तरी सदर निवीदेमध्ये दिलेले दर खालील प्रमाणे आहेत.

अ.क्र	कंत्राटदाराचे नाव	रक्कम
१	ABIR CORPORATION	38,47,572/-
२	MEHTA ENTERPRISES	41,72,204/-
३	ADITYA ENTERPRISES	42,39,112/-

तरी प्राप्त निवीदाधारका पैकी **ABIR CORPORATION** चे दर प्रति नग १९,२३,७८६/- अशे एकूण रू. ३८,४७,५७२/- (अक्षरी अडोतीस लक्ष सत्तेचाळीस हजार पाचशे बहात्तर रूपये फक्त) सर्वात कमी असून **ABIR CORPORATION** यांना कार्यादेश देण्याचे उचित निर्णयास्तव सादर.

निर्णय – घनकचरा प्रक्रियासाठी १५० TPD Processing Plant Plant प्रकल्प उभारणी करीता या कामासाठी सर्वात कमी दर **ABIR CORPORATION** चे दर प्रति नग १९,२३,७८६/- अशे एकूण रू. ३८,४७,५७२/- यांचे दरास आर्थीक व प्रशासकिय मान्यता देण्यात येते

नगर सचिव
लातूर शहर महागरपालिका,लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

Scanned with OKEN Scanner

लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

प्रशासकिय ठराव

ठराव क्रमांक:- १०

दिनांक: १ /०३/२०२३

विषय:- लातूर शहर महानगरपालिका साल सन २०२२-२०२३ चे सुधारीत व २०२३-२०२४ चे मुळ अंदाजपत्रकास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ९६ व १०० अन्वये मान्यता देणे बाबत.

